- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४३,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३२,३५० /-
✔ चांदी : १,९८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : बुधवार, ४ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३२५ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

शेतकऱ्यांच्या नावे बनावट कागदपत्रे तयार करुन 'एसबीआय'ला तब्बल ७३.८२ कोटींचा गंडा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



नागपूर पोलीसांकडून आंतरराज्य टोळीचा पदार्फाश, तिघांना अटकगपूर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या नावे बनावट कागदपत्रे तयार करुन 'एसबीआय'ला तब्बल ७३.८२ कोटींचा गंडा घातल्याची घटना घडली आहे. गरीब आणि अल्पशिक्षित शेतकऱ्यांच्या नावाचा गैरवापर करून बनावट कागदपत्रं तयार करुन बँकेला गंडा घालण्यात आल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. तर गंडा घालणाऱ्या आंतरराज्य टोळीचा नागपूर पोलीसांकडून पर्दाफाश करण्यात आले असून टोळीतील तिघांना अटक देखील केली आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौदा आणि रामटेक तालुक्यांतील शेतकऱ्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड आणि सातबारा उतारे मिळवून त्यांच्या नावावर कृषी कर्ज उचलल्याचे उघड झाले आहे. या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी १८ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपींनी दिल्ली येथील वेअरहाउसिंग डेव्हलपमेंट अँड रेग्युलेटरी अॅथॉरिटीकडून बनावट गोदाम परवाने मिळविल्याचे तपासात समोर आलं आहे.

यवतमाळच्या झरी तालुक्यातील पाटण येथे महाराष्ट्र बँकेच्या शाखेची मागील भिंत फोडून धाडसी चोरी करीत बँकेतील सहा लाख चोरी केल्याची घटना घडली. पुराचा हाती लागू नये यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डिव्हीआरही पळवून नेला आहे. बँकेच्या काही अंतरावर फोडलेल्या अवस्थेत तिजोरी आढळून आली. घटनेची माहिती मिळताच शाखा व्यवस्थापक यांनी पाटण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

घटनेची माहिती मिळताच पाटण पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, चोरीचा तपास सुरू आहे. चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून नऊ पथके गठीत करण्यात आली असून वेगवेगळ्या ठिकाणी रवाना करण्यात आली आहे.

थोडक्यात

अमेरिकेचा इराणच्या केशम बेटावर हल्ला

तेहरान : आखाती देशांमधील वाढत्या तणावाने आता भीषण रूप धारण केले असून अमेरिकेने इराणवर मोठा लष्करी हल्ला केल्याचे वृत्त समोर आले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेले संकेत अखेर खरे ठरले असून मंगळवारी सकाळी होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये वसलेल्या इराणच्या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या केशम बेटावर अनेक शक्तिशाली स्फोट झाल्याची माहिती मिळाली आहे. इराणच्या सरकारी माध्यमांनीही या स्फोटांना दुजोरा दिला आहे.

विशेष म्हणजे, अमेरिकेत मध्यावधी निवडणुकांसाठी आजच मतदान होत असून या राजकीय घडामोडींदरम्यानच हा हल्ला झाल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. एका अमेरिकन अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीतील काही वेढलेल्या इराणच्या महत्त्वाच्या ठिकाणांवर बचावात्मक हल्ले केले आहेत. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू हे अमेरिकेच्या अध्यक्षांवर इराणविरुद्ध आणखी एक मोठी लष्करी कारवाई करण्यासाठी सातत्याने दबाव टाकत होते, जेणेकरून निवडणुकांनंतर हल्ले पुन्हा एकदा नव्याने सुरू करता येतील. दरम्यान, या संभाव्य लष्करी संघर्षामुळे संपूर्ण आखाती देशांमध्ये तणाव निर्माण होईल, अशी भीती व्यक्त करत अमेरिकेच्या अनेक प्रादेशिक मित्र राष्ट्रांनी आणि पश्चिम आशियाई देशांनी या नव्या हल्ल्यांना तीव्र विरोध दर्शवला आहे. मात्र, या हल्ल्यामुळे आगामी काळात आखातातील संघर्ष अधिक पेटण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

दोन हेलिकॉप्टर एकमेकांना धडकले श्रीनगरमध्ये ४ ठिकाणी छापे

एका भारतीय नागरिकाचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी



वृत्तसंस्था, काठमांडू

नेपाळमधील माउंट एव्हरेस्ट परिसरातील फेरिचे हेलिपॅडवर मंगळवारी सकाळी एक अत्यंत भीषण अपघात घडला. लँडिंग करत असताना दोन हेलिकॉप्टर एकमेकांवर आदळल्याने झालेल्या या दुर्घटनेत एका भारतीय नागरिकाचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. नेपाळ पोलिसांच्या प्राथमिक अहवालानुसार, सकाळी सुमारे ८ वाजून ११ मिनिटांच्या सुमारास फिशटेल एअर आणि डायनेस्टी एअरच्या हेलिकॉप्टरमध्ये ही टक्कर झाली.

पोलिस निरीक्षक मौसम तामांग यांनी दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात मृत पावलेल्या हिंदुस्थानी नागरिकाची ओळख वसंत कुमार बलरामराम्माडू अशी पटली आहे. ते फिशटेल एअरच्या हेलिकॉप्टरमधून प्रवास करत होते. याच हेलिकॉप्टरमध्ये असलेले हिंदुस्थानी वंशाचे न्यूझीलंडचे नागरिक शैलेश कृष्ण पटेल हे या अपघातात जखमी झाले आहेत. त्यांना तात्काळ प्रभू हेलिकॉप्टरच्या मदतीने काठमांड्च्या मेडिसिटी रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे. तसेच दोन्ही हेलिकॉप्टरचे वैमानिक फिशटेल एअरचे कॅप्टन प्रज्वल केसी आणि एअर डायनॅस्टीचे कॅप्टन रवींद्र प्रजापती यांनाही या दुर्घटनेत दुखापत झाली असून पुढील वैद्यकीय उपचारांसाठी त्यांनाही काठमांड्ला नेण्यात आले आहे.

घटना घडली त्यावेळी दोन्ही हेलिकॉप्टरमध्ये नेमके किती प्रवासी होते, याबाबतची एकूण संख्या अद्याप स्पष्ट झालेली नाही. पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी या घटनेबाबतची अधिक माहिती गोळा करत आहेत. दुर्घटनेची माहिती मिळताच सिमरिक एअरचे हेलिकॉप्टर तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून सध्या युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे.

वृत्तसंस्था, श्रीनगर

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) जम्मू आणि काश्मीरमधील एका कथित दहशतवादी निधीपुरवठा (टेरर फंडिंग) प्रकरणात मोठी कारवाई केली आहे. ईडीच्या श्रीनगर विभागीय कार्यालयाची पथके मंगळवारी श्रीनगरमधील चार वेगवेगळ्या ठिकाणी शोधमोहीम राबवत आहेत. दहशतवादी निधीपुरवठा प्रकरणी ईडीने जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगर येथे चार ठिकाणी छापे टाकले आहेत. हा तपास उमर आदिल दार आणि त्याच्या साथीदारांशी संबंधित असलेल्या कथित दहशतवादी निधीपुरवठा नेटवर्कवर केंद्रित आहे.

उमर आदिल दार आणि त्याच्या साथीदारांशी संबंधित दहशतवादी निधीपुरवठा प्रकरणाच्या सुरू असलेल्या तपासाचा भाग म्हणून ही कारवाई केली जात आहे. या प्रकरणात गुंतलेले आर्थिक व्यवहार आणि कथित दहशतवादी निधीपुरवठा नेटवर्क उघडकीस आणणे, हे तपास यंत्रणेचे उद्दिष्ट आहे. ईडीचा तपास उमर आदिल दारच्या कथित कारवायांशी संबंधित आहे. असा आरोप आहे की, उमर आदिल दारने बंदी घातलेल्या दहशतवादी संघटना लश्कर-ए-तोयबासाठी ओव्हरग्राउंड वर्कर म्हणून काम केले. तो संघटनेशी संबंधित कारवायांमध्ये सक्रियपणे सहभागी होता, असाही आरोप आहे.



तपास यंत्रणा या प्रकरणात त्याच्या साथीदारांची भूमिका आणि त्यांच्या आर्थिक नेटवर्कचाही तपास करत आहे. तपासात असे उघड झाले आहे की, उमर आदिल दारला यापूर्वी त्याच्या काही साथीदारांसह अटक करण्यात आली होती. त्यावेळी त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात रोकड जप्त करण्यात आली होती. एका प्रतिबंधित दहशतवादी संघटनेशी संबंधित आक्षेपार्ह साहित्यही सापडल्याचे वृत्त आहे. ईडी या जप्त केलेल्या वस्तू आणि आरोपींच्या कथित कारवायांना सध्या सुरू असलेल्या दहशतवादी निधीपुरवठा प्रकरणाशी जोडत आहे.

विविध पैलूंचा तपास सुरू

तपास यंत्रणेनुसार, उमर आदिल दार याला जम्मू आणि काश्मीरमधील फुटीरतावादी आणि देशविरोधी कारवायांमध्ये कथित सहभागाबद्दल यापूर्वी तुरुंगवास झाला आहे. त्याने जवळपास चार वर्षे तुरुंगवास भोगला आहे. ईडी आता त्याच्या पूर्वीच्या प्रकरणांच्या आणि कथित कारवायांच्या विविध पैलूंचा तपास करत आहे. तथापि, सध्याच्या शोध मोहिमेचा मुख्य उद्देश कथित दहशतवादी निधीचे स्रोत आणि त्यात सामील असलेल्यांना ओळखणे हा आहे.

आशियात संघर्ष पेटणार?

वृत्तसंस्था, तैपेई

तैवानच्या आसपास चीनच्या अचानक वाढलेल्या सैन्य हालचालीने पुन्हा एकदा आशिया-प्रशांत क्षेत्राच्या सुरक्षेबाबत चिंता निर्माण झाली आहे. ३ नोव्हेंबरला स्थानिक वेळेनुसार सकाळी ६ वाजेपर्यंत गेल्या २४ तासांत चीनचे ४९ सैन्य विमान, ६ नौदल जहाजे आणि ६ युद्धनौका तैवानच्या जवळ दिसल्याचं तैवानी संरक्षण मंत्रालयाने सांगितले. २०२६ मध्ये आतापर्यंत एका दिवसात इतक्या मोठ्या संख्येने पहिल्यांदाच सैन्य हालचालींची नोंद झाली. याआधी फेब्रुवारीत ४२ चिनी सैन्य विमानांची नोंद झाली होती.

तैवानच्या संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, ४९ पैकी ३१ चिनी विमानांनी तैवान सामुद्रधुनीची मध्यरेषा ओलांडून तैवानच्या हवाई संरक्षण ओळख क्षेत्रात प्रवेश केला. ही मध्यरेषा बऱ्याच काळापासून तैवान आणि चीन यांच्यातील अनधिकृत लष्करी सीमा म्हणून काम करते. मात्र चीन याला अधिकृत सीमा मानत नाही आणि अलीकडच्या वर्षांत त्यांची लष्करी विमाने नियमितपणे ही सीमा ओलांडत आहेत. हवाई संरक्षण ओळख क्षेत्र हे एखाद्या देशाच्या सार्वभौम हवाई क्षेत्रासारखे नसते. हे एक ओळख क्षेत्र आहे, जिथे संभाव्य सुरक्षा धोके वेळेवर ओळखण्यासाठी येणाऱ्या विमानांवर देखरेख ठेवली जाते.



अमेरिकेच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का



वृत्तसंस्था, अमेरिका

अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. अमेरिकेत मध्यावधी निवडणुकीत ट्रम्प यांना धक्का बसला आहे. सुरुवातीच्या निकालांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन्स पक्षाची मोठी पिछेहाट पाहायला मिळत आहे. प्रतिनिधीगृहाच्या ११७ जागांचे निकाल हाती, ७६ जागी डेमोक्रॅट्स विजयी झाली आहे. तर ट्रम्प यांच्या रिपब्लिकन्सचे ४० उमेदवार विजयी झाले आहेत. प्रतिनिधीगृहाच्या ४३५ पैकी ११७ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत.

सिनेटमध्येही ट्रम्प यांच्या रिपब्लिकन्स पक्षाला धक्का बसला आहे. सिनेटच्या ३५ पैकी १५ जागांचे निकाल लागले हाती आले असून ११ जागी डेमोक्रॅट्स विजयी झाले असून ट्रम्प यांच्या रिपब्लिकन्स पाटीर्ला फक्त ३ जागा मिळाल्या आहेत.

जगातील सर्वात जुन्या लोकशाही देशात होत असलेल्या या निवडणुकीबाबत भारतीयांच्याही मनात अनेक प्रश्न आहेत. विशेषतः या निवडणुकीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाच्या जागा कमी झाल्या, तर त्याचा भारताला फायदा होणार की नुकसान, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या निवडणुकीकडे ट्रम्प सरकारच्या कामकाजावरील जनमत चाचणी म्हणून पाहिले जात आहे. त्यामुळे या निवडणुकीचा भारतावर नेमका काय परिणाम होऊ शकतो, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला, तर भारताला थेट मोठा फायदा किंवा मोठे नुकसान होण्याची शक्यता नाही. कारण अमेरिकेच्या परराष्ट्र आणि व्यापार धोरणातील अनेक महत्त्वाचे निर्णय थेट व्हाईट हाऊस म्हणजेच कार्यकारी यंत्रणेच्या अखत्यारीत येतात. मात्र, या निकालाचे काही सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम भारतावर नक्कीच होऊ शकतात.

संपादकीय लेखणीतून...

विरोधकांचा एल्गार

निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि एसआयआर प्रक्रियेच्या निषेधार्थ तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीने रविवारी पुन्हा एकदा एल्गार पुकारला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या मदतीशिवाय नरेंद्र मोदी हे पुन्हा पंतप्रधान होऊच शकले नसते. ज्ञानेश कुमार यांनी मतचोरीचा कट रचला आहे आणि त्यांना तुरुंगात जायलाच हवे, असा थेट आरोप करत राहुल गांधी यांनी मतचोरीच्या मुद्यावरून सरकारची कोंडी केली. सुमारे चार तास चाललेल्या रॅलीत २० विरोधी पक्ष सहभागी झाले होते. यावेळी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ज्ञानेश कुमार यांच्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर जोरदार टीका केली. या महारॅलीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, ममता बॅनर्जी, फारूख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती, एम. ए. बेबी यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांनी भाषणे केली.सभेला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यापर्यंत जो संदेश पोहोचवायचा होता, तो या जनसागराने पोहोचवला आहे.

हा केवळ एका राजकीय पक्षाचा आवाज नाही, तर देशातील तरुण, शेतकरी आणि सामान्य जनतेचा हुंकार आहे. या देशातील लोकशाही आम्ही कोणत्याही परिस्थितीत संपुष्टात येऊ देणार नाही. तुमच्याकडे प्रचंड पैसा असेल, तुम्ही स्वतःला खूप मोठे समजत असाल, पण लक्षात ठेवा, तुम्ही संविधानापेक्षा मोठे नाही. विरोधी पक्षनेत्यांनी विद्यार्थी, नागरिक आणि सामाजिक संघटनांना या चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले होते. तसेच सणासुदीच्या काळात स्थानिक विक्रेत्यांना पाठिंबा देण्यासाठी त्यांच्याकडून खरेदी करण्याचे आवाहनही त्यांनी आंदोलकांना केले. पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या, आम्ही हार मानणार नाही. आम्ही आमचा जीव देऊ, आम्ही लढू. आमचा बंगाल लुटला गेला आहे. आम्ही लोकशाही वाचवू. लोकशाही लुटली गेली आहे, हक्क लुटले गेले आहेत, मतमोजणी लुटली गेली आहे. आम्ही बंगालमध्ये हरलो नाही, हरवले गेलो. नॅशनल कॉन्फरन्सचे फारूख अब्दुल्ला म्हणाले, आपल्याला फक्त देवाची भीती बाळगायची आहे,या लोकांची नाही. ते सतत मुस्लिमांकडे बोट दाखवतात, हे सांगण्यासाठी आम्ही येथे जमलो आहोत. ते म्हणतात की, हे पाकिस्तानी आहेत. मला भाजपला सांगायचे आहे की, आम्ही भारतासाठी रक्त सांडले आहे. यापुढेही सांडत राहू. आम्हाला या देशात राहायचे आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, जोपर्यंत ज्ञानेश कुमार जात नाहीत, तोपर्यंत आम्ही लढा देत राहू. ज्ञानेश कुमार भूमिगत झाले तरी आम्ही त्यांना शोधून परत आणू. तुम्ही सीबीआय, ईडी यासारख्या यंत्रणांचा वापर करून घाबरवण्याचा प्रयत्न करता, पण आम्ही घाबरणार नाही. आजचे केंद्र सरकार, बिहार सरकार, उत्तर प्रदेश सरकार ही सर्व चोरीची सरकारे आहेत. या चोरांना हटवलेच पाहिजे. देशाची व्यवस्था रुळावर आणण्यासाठी सर्वांत आधी ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवणे गरजेचे आहे. अमित शहा म्हणतात की, नरेंद्र मोदी कुठेही जाणार नाहीत. पण मी सांगू इच्छितो की, जनता त्यांना सत्तेत राहू देणार नाही. ज्ञानेश कुमार यांच्यानंतर या प्रकरणात जबाबदार असणाऱ्या प्रत्येकावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे राहुल गांधी म्हणाले. ज्ञानेश कुमार यांच्या संदर्भात केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यायची आवश्यकता आहे.निर्णय घेतला नाही, त्यामुळे दिल्लीत विरोधी पक्ष एकत्र येत आहेत. सुप्रिया सुळे आणि संजय राऊत हे आंदोलनात लढणार आहेत. माझे लक्ष पाणी-चारा आणि दुष्काळावर आहे. यंदा आमच्याकडे दिवाळी नाही, आम्ही दिवाळी साजरी करणार नाही. सध्या शेतकरी आणि जनता पाणी आणि चाऱ्याच्या भीषण समस्येला तोंड देत आहे, असे दुष्काळी दौऱ्यावर निघालेल्या राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी सांगितले. काँग्रेस आणि त्यांच्या सहकारी पक्षांची लढाई ही भारत आणि संविधानाच्या विरोधात असल्याचा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. राहुल गांधी यांच्या पक्षाला आणि त्यांच्या ट्रस्टला चीनकडून देणगी का मिळते, असा सवाल करत त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. लोकतंत्र बचाव, अराजकता हटाव्चा नावाखाली काँग्रेस इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडी पंतप्रधान मोदीविरोधात फेक नॅरेटिव्ह पसरवत आहेत असा आरोप एकनाथ शिंदे यांनी केला.

तीच घराची पालनकर्ती, तीच अंगणाची शोभा

आपल्या भारतीय संस्कृतीत मुलींना "लक्ष्मी रुप" म्हटले जाते ते उगाच नाही. कारण, स्त्रीच जगाची पालनकर्ती आहे आणि स्त्रीच जन्म निर्मितीचे स्थान नि मार्ग आहे. स्त्री मुळेच घरा-दाराला, अंगणाला, नात्यांना, सुखाःना खरी शोभा आहे. स्त्री आहे म्हणून तर घराचं घरपण चांगलं टिकून राहतं. मुलगी माहेरचा उंबरठा ओलांडून लग्न करुन जेव्हा सासरी येते तेव्हा ती माहेरच्या संस्काराची शिदोरी सोबत घेऊन येते. आणि त्या शिदोरीचा उपयोग करतंच ती सासर घरी "उत्तम गृहिणी" बनते.

ती सासरघरी सांभाळत असलेल्या सर्व जबाबदाऱ्या, नातीगोती, उणेदुणे सगळं कांही अगदी हसत आणि आद्य कर्तव्य म्हणून बजावत असते. सकाळी पहाटेपासून ते रात्रीच्या बारापर्यंत तिला वा तिच्या हाताला काम, काम आणि केवळ कामच असतं. स्वतः साठी एखादी गोष्ट करावी हा विचारही चुकून कधी तिच्या मनात डोकावून पाहत नाही. इतकी व्यस्त असते ती संसारात. घरकामातून थोडीशी उसंत मिळत नाही तिला कि कधी डोळ्यांच्या पापण्यावर असलेली झोपेची डुलकी तिला झोपेसाठी आग्रह करीत नाही. डोळ्यांतील झोप ती अगदीच सहज अन अलगद झटकून टाकते. स्त्री घराची, घराच्या चार भिंतींची खरी गरज असते. दाराला लावलेलं तोरण, अंगणातील हिरवीशार, झुपकेदार तुळस तिच्यामुळेच तर शोभून दिसते, घरातील प्रत्येकांच्या चेहऱ्यावरील हसू ती सदैव स्वतःच्या ओंजळीत सामावून ठेवत असते. कधीही हातातून न निसटण्यासाठी. प्रत्येक नात्यातील आपुलकी, प्रेम, माया, जिव्हाळा तीच तर अबाधित ठेवत असते. म्हणून तर घरातील नात्यांचा प्रेमाचा सुगंध प्रत्येकांच्या चेहऱ्यावरील समाधानात उमटलेलं दिसून येतं. दुडूदुडू चालणारी तिची पावलं तिच्या माहेराच्या अंगणाची शोभा वाढवींत असतात. माहेरची शान मुलगी असते, बहीण बनून ती भावाच्या मनगटावरील राखी बनते, वयात आली कि बाबांची इज्जत बनते, आईची सखी बनते. आणि सासरघरची लक्ष्मी बनून सासर उजळवून टाकते. पतिरायाची सोबती बनून त्याच्या प्रत्येक पावलांना साथ देते. आणि हा गोड, हळवा प्रवास करत करत सासर सांभाळणारी गृहिणी बनते. आणि ती आई झाली कि घराचं रुप बदलवत आणि संस्कारांच्या मोत्यांनी मुलांना न्हाऊ घालत साऱ्या घराला स्वर्ग बनवते. स्वतःचा, स्वतःच्या अस्तित्वाचा ठाव जाणूला सारत घराला घरपण बहाल करते.

- सौ. मनीषा विशाल सोन्लेकर/सोनकांबळे, मो.९९६००२८८९९

संविधान रक्षक की आणीबाणीचे जनक काँग्रेसपुढचे ऐतिहासिक सत्य

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

संविधान रक्षक की आणीबाणीचे (आणीबाणीचे जनक)' हा वाद भारतीय राजकारणात काँग्रेस पक्षाच्या भूमिकेभोवती नेहमीच चर्चिला जातो. एका बाजूला भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे आणि संविधान निर्मितीमध्ये मोलाचे योगदान देणारा पक्ष अशी काँग्रेसची प्रतिमा आहे, तर दुसऱ्या बाजूला लोकशाहीचा गळा घोटणारी १९७५ ची आणीबाणी ही देखील काँग्रेसच्याच कार्यकाळात लागू झाली होती.

भारतीय राजकारणात लोकशाही आणि संविधानाचे रक्षण हा अत्यंत वादविवाद आणि चर्चेचा विषय राहिलेला आहे. काँग्रेस पक्षाने विविध आंदोलने आणि मोर्चांद्वारे (जसे की रामलीला मैदानावरील सभा) सत्ताधाऱ्यांवर लोकशाही संस्था कमकुवत केल्या. ज्या संविधान रक्षणाची व लोकशाही वाचविण्याची भाषा आज काँग्रेस करत आहे त्याच काँग्रेसने राज्यघटनेला व लोकशाहीला कलंकित केले हा इतिहास आहे हा इतिहास काँग्रेस विसरली का? संविधान हे राजकीय पक्षांच्या सोयीप्रमाणे वापरण्याचे साधन नसून संपूर्ण राष्ट्राच्या लोकशाही अस्तित्वाचा आधारस्तंभ आहे. सत्तेत असताना संविधानातील तरतुदींचा वापर स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी करायचा आणि विरोधी पक्षात गेल्यानंतर संविधान धोक्यात आल्याचा आक्रोश करायचा, ही राजकीय दुटप्पी भूमिका काँग्रेसची लोकशाहीच्या आरोग्यासाठी योग्य नाही.

इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात लागू करण्यात आलेली २१ महिन्यांची आणीबाणी (१९७५-७७)हा स्वतंत्र भारताच्या लोकशाहीतील सर्वात वादग्रस्त टप्पा मानला जातो. या काळात मूलभूत हक्क स्थगित करण्यात आले, विरोधी नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले आणि माध्यमांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली. समीक्षक या घटनेला संविधानावरील सर्वात मोठा आघात मानतात.१९७५ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती, ज्याला भारतीय लोकशाहीच्या इतिहासात एक काळा अध्याय मानले जाते. २१ महिने (२१ मार्च १९७७ पर्यंत) चाललेल्या या आणीबाणीने देशाची लोकशाही व्यवस्था पूर्णपणे हादरवून सोडली होती.

आणीबाणी लागू करून नागरिकांचे मूलभूत अधिकार निलंबित केले

सरकारविरोधात बोलणे, लिहिणे किंवा शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार जनतेकडून हिरावून घेतला गेला. 'मीसा' सारख्या कडक कायद्यांतर्गत कोणालाही विनावॉरंट अटक करण्याचे अधिकार पोलिसांना मिळाले होते. इंदिरा गांधींनी विरोधी नेत्यांना तुरुंगात डांबले. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, जॉर्ज फर्नांडिस यांच्यासह हजारों विरोधी नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना रात्रीतून तुरुंगात डांबण्यात आले होते.राजकीय विरोध मोडून काढण्यासाठी सत्तेचा गैरवापर केला गेला.

माध्यमांवर कडक सेन्सॉरशिप लादण्यात आली होती. सरकारला मंजुरी असल्याशिवाय कोणतीही बातमी किंवा लेख छापण्यास बंदी होती. या दडपशाहीचा निषेध म्हणून काही वृत्तपत्रांनी (उदा. 'द इंडियन एक्स्प्रेस') आपले संपादकीयचे पान कोरे सोडून सरकारचा निषेध केला होता.इंदिरा गांधी आणि त्यांचे सुपुत्र संजय गांधी यांच्या हाती सर्व सत्ता केंद्रित झाली होती. घटनेत दुरुस्ती करून संसदेचा कार्यकाळ वाढविलाआणि न्यायालयाचे अधिकार मर्यादित करण्यासाठी संविधानात ४२ वी दुरुस्ती करण्यात आली, ज्याला अनेकदा 'मिनी कॉन्स्टिट्यूशन' म्हटले जाते. याशिवाय संजय गांधी यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आलेली सक्तीची नसबंदी आणि दिल्लीतील झोपडपट्ट्या हटवण्याची मोहीम (उदा. तुर्कमान गेट दुर्घटना) अत्यंत क्रूर आणि अमानुष ठरली.

काँग्रेसच्या दीर्घकालीन राजवटीत राज्यांमधील विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त करण्यासाठी कलम ३५६ (राष्ट्रपती राजवट) चा वारंवार वापर करण्यात आल्याचा आरोप केला जातो, ज्यामुळे संघराज्यात्मक रचनेला तडा गेल्याचे म्हटले जाते.१९७० च्या दशकात सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या सेवाज्येष्ठतेचा अधिकार डावलून सरन्यायाधीशांची नियुक्ती करण्याच्या निर्णयावरही लोकशाही मूल्यांचा संकोच केला.

१९७७ मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी मागे घेऊन निवडणुका जाहीर केल्या. भारतीय जनतेने या हुकूमशाही प्रवृत्तीला मतपेटीच्या माध्यमातून चोख उत्तर दिले. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसचा दारूण पराभव झाला आणि इंदिरा गांधी स्वतःची जागाही वाचवू शकल्या नाहीत. देशात पहिल्यांदाच बिगर-काँग्रेस (जनता पक्ष) सरकार स्थापन झाले. १९७७ च्या निवडणुकीत जनतेने काँग्रेसला सत्तेबाहेर केले. त्यानंतर जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले. पुढे १९७८ मध्ये ४४ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीने आणीबाणी लागू करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे संरक्षणात्मक बदल केले आणि नागरिकांच्या काही मूलभूत अधिकारांचे संरक्षण अधिक मजबूत केले.भारतीय लोकशाहीमध्ये चुका झाल्या, दडपशाही झाली; परंतु जनतेने मतपेटीतून सत्तेला उत्तर दिले आणि घटनात्मक व्यवस्थेने स्वतःमध्ये सुधारणा करण्याची क्षमता जनता पक्षाने दाखवली.

ज्या काँग्रेसने घटनात्मक मूल्य लोकशाहीची मूल्य पायदळी तुडविली ती काँग्रेस आज मोदी सरकारवर खोटे आरोप करत जनतेत संभ्रम निर्माण करत आहे. संविधानाची व लोकशाही मूल्यांची पायमल्ली काँग्रेसने केली आज काँग्रेस मोदी सरकारवर घटना बचाव लोकतंत्र बचाओ चा नारा देत वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन करत सरकार विरोधात नकारात्मक वातावरण तयार करत आहेत सरकारला अस्थिर करण्याचे काम करत आहे. मोदी सरकारच्या काळात अर्थात एन डी ए च्या काळात ना घटनेची पायमली झाली लोकशाहीची. ना आणीबाणी लावण्यासाठी, विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले. सरकारने नेहमीच संसदेच्या आणि न्यायालयाच्या चौकटीत राहून निर्णय घेतले आहेत. वारंवार निवडणुका जिंकून जनतेने या सरकारला मोठा कौल दिला आहे, जे लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण आहे. मोदी सरकारने विधान दिन साजरा करणे आणि संविधानिक मूल्यांविषयी जनजागृती. संसदेमधील घटनात्मक चर्चा आणि कायदे करण्याची प्रक्रिया. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांची घटनात्मक भूमिका. निवडणूक प्रक्रियेच्या माध्यमातून सत्तेची वैधता प्राप्त करणे. थेट लाभ हस्तांतरणामुळे सरकारी योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न. जनधन, आधार आणि डिजिटल व्यवहारांमुळे प्रशासनातील पारदर्शकतेला मिळालेली चालना. महिला, गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी राबविण्यात आलेल्या कल्याणकारी योजना लोकशाही पद्धतीने राबविल्या.

मोदी सरकारच्या कार्यकाळात संविधानाचा पूर्ण आदर केला गेला आहे. सरकारने वेळोवेळी 'संविधान दिन' साजरा करून आणि संसदेत विशेष चर्चा घडवून आणून संविधानाप्रती आपली कटिबद्धता जाहीर केली आहे. विरोधी नेत्यांवर होणाऱ्या कारवाईबाबत सरकारचा असा युक्तिवाद आहे की, केंद्रीय तपास यंत्रणा (उदा. एऊ उइक) या स्वायत्तपणे आणि केवळ भ्रष्टाचार किंवा आर्थिक गैरव्यवहारांच्या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कारवाई करत आहेत. यामध्ये कोणताही राजकीय आक्षेप किंवा सूडबुद्धी नाही. कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून (आणि शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचवून लोकशाही तळागाळात मजबूत केली आहे. संविधान वाचविण्यासाठी आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा लोकशाही अधिकार आहे.मात्र संविधानाच्या नावाने आंदोलन करणाऱ्या राजकीय पक्षांनी स्वतःच्या ऐतिहासिक भूमिकेचेही आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. काँग्रेसने आज संविधान रक्षणाचा नारा देताना आणीबाणीच्या काळातील आपल्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारली आहे का? तत्कालीन राजकीय चुकांबद्दल नव्या पिढीसमोर प्रामाणिक भूमिका मांडली आहे का?

ऐतिहासिक सत्य हेच आहे की, काँग्रेसने भारताला संविधान आणि लोकशाही व्यवस्था देण्यात जेवढे मोठे योगदान दिले, तेवढाच मोठा धक्का १९७५ च्या आणीबाणीमुळे या व्यवस्थेला बसला. त्यामुळे काँग्रेसचा इतिहास हा एकाच वेळी 'संविधानाचा पाया रचणारा' आणि 'तिला तात्पुरते धोक्यात आणणारा' अशा दोन्ही परस्परविरोधी ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार आहे.

- ९५६१५१४३०६

ईशान किशन टीम इंडियात हवाच हवा!

डॉ.दत्ता विघावे क्रिकेट समिक्षक

अष्टपैलू उपयुक्तता, आक्रमक फलंदाजी आणि यष्टीरक्षणाचा दुहेरी पर्याय; २०२७ विश्वचषकासाठी दुर्लक्ष परवडणारे नाही!

२०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी भारतीय संघाची बांधणी करताना निवड समितीसमोर केवळ गुणवत्तापूर्ण फलंदाज निवडण्याचे आव्हान नाही, तर परिस्थितीनुसार वेगवेगळ्या भूमिका पार पाडू शकणारे खेळाडू निवडण्याचेही आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर ईशान किशन हा भारतीय संघासाठी अत्यंत उपयुक्त पर्याय ठरू शकतो. आक्रमक फलंदाजी, यष्टीरक्षण आणि फलंदाजीच्या क्रमवारीत लवचिकता या तीन महत्त्वाच्या गुणांमुळे त्याचा विश्वचषक संघातील समावेश आवश्यक वाटतो.

न्यूझीलंड दौऱ्यातील अखेरच्या दोन एकदिवसीय सामन्यांसाठी त्याच्याकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. कसोटी मालिकेसाठी निवडलेले खेळाडू या सामन्यांत उपलब्ध नसल्याने शुभमन गिलसह काही प्रमुख खेळाडूंची अनुपस्थिती असेल. अशा परिस्थितीत ईशानवर दाखविलेला विश्वास हा त्याच्या नेतृत्वगुणांची आणि भविष्यातील महत्त्वाची भूमिका बजावण्याच्या क्षमतेची चाचणी मानता येईल.

तीन भूमिका, एकच खेळाडू!

ईशान किशनची सर्वांत मोठी जमेची बाजू म्हणजे तो संघाच्या गरजेनुसार तीन वेगवेगळ्या भूमिका पार पाडू शकतो.

१. सलामीवीर : डावाची सुरुवात करताना पहिल्या चेंडूपासून गोलंदाजांवर दबाव निर्माण करण्याची क्षमता त्याच्यात आहे.

२. मधल्या फळीतील फलंदाज : परिस्थितीनुसार पहिल्या सहा क्रमांकांमध्ये कोणत्याही स्थानावर फलंदाजी करू शकतो.

३. यष्टीरक्षक : आक्रमक फलंदाजीबरोबरच यष्टीमागील जबाबदारी समर्थपणे सांभाळू शकतो.

मर्यादित १५ सदस्यीय विश्वचषक संघात अशा बहुपयोगी खेळाडूचे महत्त्व अधिक असते. एखादा फलंदाज किंवा यष्टीरक्षक जखमी झाल्यास पर्यायी व्यवस्था करण्यासाठी ईशान उपयुक्त ठरू शकतो.

द्विशतक झळकावले, तरी विश्वचषकात संधी नाही!

ईशान किशनच्या गुणवत्तेची सर्वांत मोठी साक्ष म्हणजे डिसेंबर २०२२ मध्ये बांगलादेशविरुद्ध त्याने झळकावलेले द्विशतक. अवघ्या १२६ चेंडूंत २०० धावा करत त्याने एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वात वेगवान द्विशतकाचा विक्रम नोंदविला होता. मात्र एवढी अफाट कामगिरी करूनही २०२३ च्या विश्वचषकात त्याला अंतिम अकरामध्ये नियमित स्थान मिळाले नाही. रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांची सलामीची जोडी हे त्यामागील प्रमुख कारण होते. मात्र एका खेळाडूची उपयुक्तता केवळ सलामीवीर म्हणूनच तपासणे योग्य ठरणार नाही. ईशानने मधल्या फळीतही आपली क्षमता दाखवून दिली आहे. त्यामुळे त्याला केवळ राखीव सलामीवीर म्हणून मर्यादित ठेवणे भारतीय संघाच्या दृष्टीने नुकसानकारक ठरू शकते.

ईशानची तिन्ही प्रकारांतील आंतरराष्ट्रीय कामगिरी

ईशान किशनची आंतरराष्ट्रीय आकडेवारी त्याच्या गुणवत्तेची आणि आक्रमक फलंदाजीची साक्ष देते. एकदिवसीय क्रिकेटमध्ये १७७.०६ चा स्ट्राइक रेट आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १४८.५६ चा स्ट्राइक रेट ही त्याची आक्रमक फलंदाजी अधोरेखित करतात. विशेष म्हणजे, त्याने तिन्ही प्रकारांत मिळून ३,१४० आंतरराष्ट्रीय धावा केल्या आहेत. कसोटी क्रिकेटमधील नमुना मर्यादित असला, तरी त्याने मिळविलेली



७८ ची सरासरी लक्षवेधी आहे.

सलामीवीर म्हणून अधिक प्रभावी!

एकदिवसीय क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून ईशानने नऊ डावांत ६१.८७ च्या सरासरीने धावा केल्या आहेत. तुलनेत मधल्या फळीत त्याची सरासरी सुमारे ३४ आहे. त्यामुळे सलामीला त्याची फलंदाजी अधिक प्रभावी ठरल्याचे दिसते. मात्र याचा अर्थ त्याला मधल्या फळीत संधी देऊ नये असा होत नाही. संघाच्या गरजेनुसार भूमिका बदलण्याची त्याची क्षमता हीच त्याची खरी ताकद आहे.

न्यूझीलंड दौऱ्यात स्वत:ला सिद्ध करण्याची संधी

न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेतही ईशानने आपली आक्रमकता दाखवून दिली आहे. हॅमिल्टन येथे १ नोव्हेंबर रोजी झालेल्या पाचव्या टी-२० सामन्यात त्याने अवघ्या ३२ चेंडूत ६१ धावांची धडाकेबाज खेळी केली. अशा खेळींमधून त्याचा आत्मविश्वास आणि मोठ्या व्यासपीठावर प्रभाव पाडण्याची क्षमता दिसून येते. आता एकदिवसीय मालिकेतील संधीचे सोने करणे त्याच्यासाठी महत्त्वाचे ठरेल. विशेषतः मधल्या फळीत फलंदाजी करताना डाव सावरणे आणि गरज पडल्यास धावांचा वेग वाढविणे या दोन्ही गोष्टी त्याला सिद्ध कराव्या लागतील.

रोहितच्या पुनरागमनामुळे जयस्वालचा मार्ग खडतर!

रोहित शर्माच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे सलामीच्या जागेसाठीची स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे. यापूर्वी यशस्वी जयस्वालला भविष्यातील सलामीवीर म्हणून पाहिले जात होते. त्याच्याकडे मोठी खेळी करण्याची क्षमता आहे; मात्र त्याची फलंदाजी प्रामुख्याने सलामीच्या स्थानाशी जोडलेली आहे. ईशानच्या तुलनेत त्याच्याकडे यष्टीरक्षणाचा पर्याय उपलब्ध नाही. विश्वचषकासाठी संघ निवडताना राखीव सलामीवीर, यष्टीरक्षक आणि मधल्या फळीतील पर्याय यांचा समतोल साधावा लागणार आहे. या निकषांवर ईशान किशनचे पारडे जड ठरू शकते.

निवड समितीने केवळ नाव नव्हे, तर उपयुक्तता तपासावी!

२०२७ च्या विश्वचषकासाठी भारतीय संघाची निवड करताना ईशान किशनकडे केवळ एक पर्यायी फलंदाज म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. त्याच्या आक्रमक फलंदाजीला योग्य संधी, सातत्यपूर्ण पाठबळ आणि स्पष्ट भूमिका मिळाली, तर तो भारतीय संघासाठी महत्त्वाचा सामना जिंकून देणारा खेळाडू ठरू शकतो. विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धेत केवळ नामांकित खेळाडू नव्हे, तर परिस्थितीनुसार स्वतःची भूमिका बदलणारे खेळाडू अधिक मोलाचे ठरतात. ईशानकडे ही क्षमता आहे. त्यामुळे त्याला पुरेशा संधी देऊन तयार करणे ही निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. ईशान किशनला संघात स्थान देणे हा केवळ एका गुणवंत खेळाडूला न्याय देण्याचा विषय नाही, तर भारतीय संघाच्या विश्वचषक तयारीतील एक महत्त्वाचा रणनीतिक निर्णय ठरू शकतो. त्यामुळे २०२७ च्या विश्वचषकासाठी ईशान किशन टीम इंडियात हवाच हवा !

- ९०१६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

मनपातर्फे शहरात ५ सीएनजी पंप सुरू करणार

मनपाच्या बस डेपोंच्या विकासासाठी १३ कोटी ८४ लाख रुपये मंजूर, मनपाच्या परिवहन समितीच्या बैठकीत निधीला मंजुरी प्रदान

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मनपाच्या परिवहन विभागाच्या अखत्यारितील वाठोडा, खापरी, वाडी, हिंगणा व कारखाना विभागातील जागांवर बीओटी (बांधा-वापरा-हस्तांतरीत करा) या तत्वावर ५ सीएनजी पंप सुविधा विकसित करण्याचा प्रस्तावाला आज मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे नागपूर महानगरपालिकेच्या मोरभवनसह शहरातील तसेच शहराच्या बाहेर असलेल्या बस डेपोमध्ये पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी १३ कोटी ८४ लाख १७ हजार ९६७ रुपयांच्या प्रशासनाच्या प्रस्तावाला मनपाच्या परिवहन समितीने आज मंजुरी प्रदान केली.



परिवहन समितीच्या सभापती मंगला खेकरे यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन समितीची बैठक डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात आज (ता. ३) पार पडली. यावेळी समितीचे उपसभापती सुधीर(बंड्) राऊत, सदस्य विजय होले, शकील पटेल, श्रीमती पूजा पाठक, प्रमिला मथरानी, अर्चना पडोळे, मंगला मस्के, अतिरिक्त आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक मिलिंद मेश्राम, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे, प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, व्यवस्थापक राजीव घाटोळे उपस्थित होते.

शहरातील बस वाहतुकीची वाढती आवश्यकता, प्रवाशांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच बसेसची पार्किंग, देखभाल व संचालन अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी मनपाच्या बस डेपोमध्ये पायाभूत सुविधा विकसित करण्याची आवश्यकता असल्याचे सभापती मंगला खेकरे यांनी मत मांडले. यात नवीन हिंगणा बस डेपो, खापरी बस डेपो, मोरभवन बस डेपो, जुना हिंगणा बस डेपो, व कोराडी बस डेपोमध्ये पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येणार आहे. या सर्व पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी १३ कोटी ८४ लाख १७ हजार ९६७ रुपयांची आवश्यकता आहे. या विकासकामामुळे बसेसची पार्किंग, देखभाल व संचालन करणे अधिक कार्यक्षमतेने होण्यास मदत होणार आहे.

मोरभवनमध्ये कॉंक्रीटीकरण होणार

मोरभवन बस डेपो हा शहराच्या मध्यवर्ती असून या ठिकाणी सर्व ठिकाणी जाणाऱ्या बसेस उपलब्ध राहतात. परंतु तेथील जागा समतल करण्याची आवश्यकता आहे. प्रवाशांना धुळीचा त्रास होत असल्याने मोरभवनचे समतल करून कॉंक्रीटकरण करण्यात यावे, अशी सूचना उपसभापती बंड् राऊत यांनी मांडली. या सूचनेला सर्व सदस्यांनी मान्यता दिली.

५ ठिकाणी सीएनजी पंप

मनपाच्या परिवहन विभागाच्या अखत्यारितील वाठोडा, खापरी, वाडी, हिंगणा व कारखाना विभागातील जागांवर बीओटी (बांधा-वापरा-हस्तांतरीत करा) या तत्वावर सीएनजी पंप सुविधा विकसित करण्याचा प्रस्तावाला आज मंजुरी देण्यात आली. यात सामान्य सीएनजी वाहनधारकांना सुद्धा सीएनजी भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यासाठी निविदा काढण्याचे ठरविण्यात आले.

मिनी बस भाडेतत्वावर

आपली बस वाहतूक सेवेअंतर्गत प्रासंगिक करारावर बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी वाहन प्रकार व आसनक्षमतेनुसार सुधारित दर निश्चित करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. यात मिनी डिझेल २५ आसनी बस ८ हजार रुपयांत दिवसभरासाठी करारावर देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे मिडी ई-बस, स्टँडर्ड ईका ई-बस सुद्धा दिवसभरासाठी भाडेकरारावर देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत बस निवारे व इतर ठिकाणी ६५ किऑस्क लावण्यात आले आहेत. ते सर्व किऑक्स परिवहन विभागाकडे हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. यासंदर्भात परिवहन विभागाकडून तपासणी करून हस्तांतरीत करण्याचे ठरविण्यात आले. बसच्या प्रकारानुसार सुधारित प्रासंगिक करार दर निश्चित करण्यात आले असून समूहाला १० बसेस बुक केल्यास २० टक्के सवलत देण्यात आलेली असून सुचनेसह ठराव मंजुर करण्यात आला.

अतिरिक्त डेपो:

वाढीव बसेससाठी संचालनासाठी वाठोडा -२ व खापरी -२ हे अतिरिक्त डेपो तयार निर्माण करण्यास आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामुळे शहरात डेपोची संख्या ८ झाली आहे.

शिल्लक रक्कम व लेखाजोखा:

जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीचा लेखाजोखा तपासणी सप्टेंबर अखेर रू. ८,२०,३८,६६५ रुपये शिल्लक रकमेसह आणि इतर महापालिकांच्या तुलनेत कमी खर्च असल्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

अर्थसंकल्प प्रावधान:

आर्थिक वर्ष २०२६-२७ करीता परिवहन विभाग बस संचालनाकरिता रु. १०८.५१ कोटी निधी मिळण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला असून बससंख्या ४३० वाढून ८२५ वर पोहोचली आहे.

थोडक्यात

१ ताडपत्री बंधाऱ्यामुळे २०० एकर गहू पिकाला एकदा पाणी देण्याची सोय होणार: मयूर दारोडे



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या सूचनेनुसार कोरड्या दुष्काळाशी सामना करण्यासाठी सध्या रामटेक विधानसभा क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या पारशिवनी, रामटेक व मौदा तालुक्यातील नाल्यांवर आर्ट ऑफ लिविंग संस्थेतर्फे ताडपत्री बंधारे बनवायला युद्ध पातळीवर सुरुवात झालेली आहे. एक ताडपत्री बंधाऱ्यामुळे दोनशे एकर गहू पिकाला एकदा पाणी देण्याची सोय होणार असल्याचे निसतखेडा येथील आर्ट ऑफ लिविंग चे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते मयूर दारोडे यांनी किरणापुर ते दुधाळा रस्त्यादरम्यान नाल्यावरील ताडपत्री बंधाऱ्याचे कामाचे सुपरविजन करीत असताना सांगितले. दारोडे यांनी पुढे सांगितले की, रामटेक विधानसभा क्षेत्रात एकूण १००० (एक हजार) ताडपत्री बनविण्याचे लक्ष असून आज मंगळवार (ता. ३ नोव्हेंबर) पर्यंत ८० ते ८५ ताडपत्री बंधारे बनवून झालेले आहेत.

जवाहर विद्यार्थी गृहात 'सुयोग' वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन ९ नोव्हेंबर ला

पुस्तिका प्रकाशन सोहळ्याचे आयोजन, नवनिर्वाचित आमदार अभिजीत वंजारी यांचा सत्कार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विवाह इच्छुक युवक- युवतींना योग्य जीवनसाथी निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जवाहर विद्यार्थी गृह, नागपूर च्यावतीने सोमवार, ९ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता. सुयोग वधू-वर परिचय पुस्तिका प्रकाशन सोहळा व परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम वेस्ट हायकोर्ट रोड, सिव्हिल लाइन्स येथील जवाहर विद्यार्थीगृहात होणार आहे. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नरेंद्रकुमार दिवटे राहतील. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य तथा आमदार अँड.अभिजीत वंजारी यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहतील व त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ अधिवक्ता अँड. आनंदराव गिरडकर आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. आरती सुभाष वंजारी उपस्थित राहणार आहेत. यावेळी सुयोग वधू-वर परिचय पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येणार असून, विवाह इच्छुक युवक - युवती व त्यांच्या पालकांना एकमेकांशी परिचय करून घेण्याची संधी मिळणार आहे. मेळाव्यास प्रवेश पूर्णतः विनामूल्य असून पुस्तिका सहयोग राशीमध्ये उपलब्ध राहणार आहे. कार्यक्रमानंतर सहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी विवाह इच्छुक युवक -युवती, पालक आणि समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जवाहर विद्यार्थी गृहाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

तुकोबाग्राम येथे कार्तिक मासानिमित्त जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपूजन सोहळा संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दक्षिण नागपूर परिसरातील प्रभाग क्रमांक ३० मधील तुकोबाग्राम येथील हनुमान मंदिरात कार्तिक मासाचे औचित्य साधून जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या संतपूजन कार्यक्रमाचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. जगद्गुरू संत तुकाराम महाराज स्मारक समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान भजन-कीर्तन व संतविचारांच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण झाले. संत तुकाराम महाराज यांच्या विचारांचा प्रसार व्हावा, तसेच समाजामध्ये भक्ती, एकता आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत व्हावा, हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश होता.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संतपूजन करण्यात आले. कार्यक्रमाला माजी नगरसेवक दीपक कापसे, विरोधी पक्ष नेता संजय महाकाळकर, श्याम थोरात, नगरसेवक रितेश पांडे, रामभाऊ कुंभलकर, ओबीसी महासंघाचे शरद वानखेडे, शरद बानते, काँग्रेस ब्लॉक ५ अध्यक्ष किशोर गोंद, सुप्रिया तिजारे, नितेश समर्थ, राजू फुटाणे, मधुर धांडे, प्रदीप काकडे, प्रवीण आगे, नुपूर बानते, गौरव धांडे,अंशुल जिचकार यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्रवीण विघरे, दिलीप राऊत तसेच संपूर्ण जगद्गुरू संत तुकाराम महाराज स्मारक समितीच्या पदाधिकारी व सदस्यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक करून कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

दोन रेल्वे फाटक कायमचे बंद होणार

नागपूर : रेल्वे आणि रस्ते वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत करण्यासाठी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने दोन महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. १० नोव्हेंबरपासून दोन रेल्वे फाटक कायमचे बंद होणार असून, पर्यायी मार्ग म्हणून नव्या उड्डाणपुलाचा वापर करावा लागणार आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील कलमना-नागपूर आणि नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन-नागपूर या रेल्वेमार्गावरील दोन मानवी नियंत्रणाखालील रेल्वे फाटक कायमस्वरूपी बंद करण्यात येणार आहेत. रेल्वे फाटक क्रमांक ५७० (किलोमीटर ११२८/६-८) आणि रेल्वे फाटक क्रमांक ५७२ (किलोमीटर ११२८/३३-३५) हे दोन्ही फाटे १० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सर्व प्रकारच्या रस्ते वाहतुकीसाठी बंद होतील. कलमना-नागपूर रेल्वेमार्गावरील फाटक क्रमांक ५७० आणि इतवारी-नागपूर रेल्वेमार्गावरील फाटक क्रमांक ५७२ यांचा वापर परिसरातील नागरिक तसेच वाहनचालकांकडून केला जातो. मात्र, आता या दोन्ही फाटकांवरून दुचाकी, चारचाकी, अवजड वाहने किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या रस्ते वाहतुकीला परवानगी राहणार नाही. निर्धारित वेळेनंतर या फाटकांमधून रस्ते वाहतूक पूर्णपणे बंद केली जाणार असल्याने वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागेल.

वनविभाग पारशिवणीची धडाकेबाज कामगिरी, वाघोडा येथील बिबट्या जेरबंद

दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी

वनपरिक्षेत्र पारशिवनी अंतर्गत मौजा वाघोडा येथे गावात घुसलेल्या बिबट्याला मंगळवारी ०३ नोव्हेंबर रोजी सकाळी ७-३० वाजता वनविभागाच्या पथकाने शिताफीने जेरबंद केले आहे. या यशस्वी कारवाईमुळे वाघोडा व परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सहवनक्षेत्र पारशिवनी, बीट भागेमहरी, मौजा वाघोडा, साहोली, डोरली, सिंगोरी परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर होता. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. याची माहिती वनविभागाला मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे यांनी तातडीने आर.आर.टी. चमूला पाचारण केले.



राहुल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपवनक्षेत्र अधिकारी जीवनप्रकाश मेंढे यांच्या समन्वयाने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत वनविभागाने पिंजरा लावून बिबट्याला सुरक्षितरित्या जेरबंद केले. जेरबंद केलेल्या बिबट्याला पुढील वैद्यकीय तपासणी व आवश्यक उपचारांसाठी ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर , नागपूर येथे सुरक्षितरित्या पाठविण्यात आले आहे. सध्या बिबट्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. या संपूर्ण मोहिमेत वनरक्षक प्रकाश कालेकर, अक्षय जाधव, शिवशंकर पिल्लेवान, सूरज बेले, दीपाली नान्हे, शुभांगी कुरंजेकर, संदीप धुर्वे, अमोल गडगिडे, राजेश सानूले, मेघा धानोडे, व्यंकट कुंभरे, अमित मेश्राम, पंकज शेंद्रे, सागर कोहळे यांच्यासह वनमजूर आणि आर.आर.टी. चमू, पारशिवनी यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले. वन्यप्राण्यांचे संरक्षण, सुरक्षित बचाव आणि मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वनविभाग कटिबद्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता वनविभागाला सहकार्य करावे, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे यांनी केले आहे.

बुधवारी काही भागातील वीज पुरवठा तात्पुरता बंद राहणार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : शहरातील महावितरणच्या काही उपकेंद्रांमध्ये सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टम बसविणे, एबी स्विचची कामे, नवीन रोहीत्राचे चार्जिंग, झाडांच्या फांद्या छाटणे आणि नियमित देखभाल व दुरुस्तीच्या कामांमुळे बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी काही वाहिन्यांवरील वीज पुरवठा तात्पुरता खंडित ठेवल्या जाणार आहे. या कामांमुळे महाल विभागात सकाळी श्रीकृष्ण नगर शाखा कार्यालयांतर्गत असलेल्या ११ केव्ही उपकेंद्र वाहीनी, एसएस १ व २ आणि चिटणीस नगर या वाहिन्यांवरील वीज पुरवठा सकाळी ७ ते ९ या वेळेत तर जुना बगडगंज शाखा कार्यालयांतर्गत असलेल्या ११ केव्ही हिवरी, महाल १ व २, शुक्रवारी, लताकिशन १, व २, सेंट्रल एव्हेन्यु रोड, आणि केडीके या वाहिन्यांवरील वीज पुरवठा सकाळी १० ते १२ या वेळेत बंद राहील. याशिवाय सकाळी ८ ते ११ या वेळेत हनुमान नगर, रामजीवन चौधरी अपार्टमेंट, महाराज टॉवर, प्रोफेसर कॉलनी, बीसीएन कार्यालय आणि आसपासचा परिसर, सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत चंदन नगर, हनुमान नगर, वकील पेठ, क्रीडा चौक आणि आसपासचा परिसर, साईबाबा नगर, मुरलीमाधव नगर, योगेश्वर नगर, स्नेहल नगर, आराधना नगर, छबिलेश्वर मंदिर परिसर आणि सकाळी ९ ते १२ या वेळेत एनआयटी गार्डन परिसर, आमदार श्री. अभीजीत वंजारी यांच्या निवासस्थानाजवळचा परिसर, खेडें हॉस्पिटल, भीष्म अपार्टमेंट, शेरूभाई बियाणीं शॉप परिसर, आणि एसपी कार्यालय परिसरातील वीज पुरवठा बंद राहील.

भिवापूरमध्ये १८ जानेवारीपासून भागवत सप्ताहाचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानच्या वतीने १८ ते २५ जानेवारी २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या भागवत सप्ताहाच्या नियोजनासाठी सोमवारी माजी आमदार राजू पारवे यांच्या उपस्थितीत देवस्थान समितीची आढावा बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीला शहरासह ग्रामीण भागातील पदाधिकारी, वारकरी, भजन मंडळांचे प्रतिनिधी, व्यापारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यंदाचा भागवत सप्ताह व्यापक स्वरूपात आयोजित करून भिवापूरच्या धार्मिक परंपरेला राज्यस्तरावर ओळख मिळवून देण्याचा संकल्प बैठकीत करण्यात आला. सप्ताहादरम्यान ह.भ.प. इंदुरीकर महाराज, पुरुषोत्तम पाटील महाराज, विशाल कोल्हे महाराज, ज्ञानेश्वर तांबे महाराज, सोपान सानप महाराज, साहिल कासार महाराज, माहुली पटाडे महाराज आणि आक्रूड साखरे महाराज यांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. या धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शहर व ग्रामीण भागातील पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी, वारकरी संप्रदाय आणि भजन मंडळांनी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

इंदुरीकर महाराजांसह आठ कीर्तनकारांची उपस्थिती, नियोजनासाठी आढावा बैठक

बैठकीला नगराध्यक्षा सुषमा श्रीराम, देवस्थान समितीचे अध्यक्ष रमेश बोरोडे, सचिव राजू सागरे, नगरसेवक विवेक ठाकरे, पिंटू श्रीराम, रमेश भजभुजे, नंदू पाचभाई, किरण नागरिकर, वैशाली पेंदाम, भाजपचे शहराध्यक्ष अनिल समर्थ यांच्यासह विविध क्षेत्रांतील पदाधिकारी, ह.भ.प. महाराज, कार्यकर्ते आणि पत्रकार उपस्थित होते.

चाचेर येथे कोजागिरी महोत्सव उत्साहात संपन्न; राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची विशेष उपस्थिती

७० रक्तदात्यांचे रक्तदान, १२५ नागरिकांची नेत्रतपासणी, संतान नाटक हाऊसफुल!

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मोदा

भगवान बाबा हनुमानजी यांच्या कृपेने व महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्या आदेशानुसार, प.पू. परमात्मा एक सेवक मंडळ शाखा - चाचेर यांच्या वतीने आणि मार्गदर्शक धर्मराज बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कोजागिरी महोत्सव विविध धार्मिक, सामाजिक, आरोग्यविषयक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात संपन्न झाला.



या महोत्सवाला महाराष्ट्र राज्याचे वित्त व नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय तसेच कामगार विभागाचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत व सहकार्य करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. रविवार(ता. १ नोव्हेंबर) ला सकाळी हवन कायनें महोत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर भगवंत व महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी आयोजित भगवत कार्याच्या चर्चासत्रात उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करून सेवकांना मानवधर्माच्या विचारांची व तत्त्वांची जाणीव करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव धर्म परिचय या पुस्तकाचे लेखक तथा ज्येष्ठ सेवक बाळूजी शेळके होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भोजराज कुल्लरकर यांनी केले, तर सूत्रसंचालन शुभम देशमुख व राहुल सोमनाथे यांनी केले. शुभम पोटभरे यांनी आभार प्रदर्शन केले.

रक्तदानातून ७० जणांचे योगदान; १२५ नागरिकांची नेत्रतपासणी

महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ७० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. तसेच मशीनद्वारे आयोजित मोफत नेत्रतपासणी शिबिराचा १२५ नागरिकांनी लाभ घेतला. धार्मिक कायासोबतच आरोग्य आणि सामाजिक सेवेचा संदेश देणारे हे उपक्रम महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले.

संतान नाटकाला प्रचंड प्रतिसाद; प्रयोग हाऊसफुल!

महोत्सवादरम्यान सांस्कृतिक पर्वात युवा रंगमंच, वडसा प्रस्तुत युवराज प्रधान निर्मित तीन अंकी संतान या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. या नाट्यप्रयोगाला चाचेरसह परिसरातील नागरिक व रसिक प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे नाटकाचा प्रयोग हाऊसफुल झाला.

सेवक-सेविकांच्या परिश्रमातून महोत्सव यशस्वी

या संपूर्ण महोत्सवाच्या यशस्वितेसाठी चाचेर शाखेतील सेवक, सेविका आणि युवा सेवकांनी नियोजनबद्ध पद्धतीने प्रचंड मेहनत घेतली. ग्रामस्वच्छता अभियानापासून ते धार्मिक विधी, चर्चासत्र, रक्तदान शिबिर, नेत्रतपासणी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांपर्यंत प्रत्येक उपक्रमात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांच्या एकजुटीने, सहकार्याने आणि परिश्रमाने कोजागिरी महोत्सव यशस्वी ठरला. धार्मिक विचारांची जोपासना, मानवसेवेचा संदेश, आरोग्यविषयक जनजागृती आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन अशा विविध उद्देशांची सांगड घालणारा हा कोजागिरी महोत्सव चाचेर परिसरासाठी संस्मरणीय ठरला.

थोडक्यात

काटोल नगरपरिषदेला कायमस्वरुपी मुख्याधिकारी द्यावा!

नगर पालिकेच्या उपाध्यक्षासहीत नगरसेवकांचे विभागीय आयुक्तांसहित जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर, १५ दिवसात निर्णय न झाल्यास काटोल येथे बेमुदत आंदोलन करण्याचा निवेदनातून दिला इशारा



दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

काटोल नगरपरिषद ही जिल्ह्यातील ब वर्ग नगरपरिषद आहे मागील वर्षी पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत सुनिल बल्लाळ हे मुख्याधिकारी म्हणून रूजू झाले. त्यानंतर त्यांची बदली झाली त्यानंतर नरखेड नगरपरिषदेत मुख्याधिकारी असलेले धनंजय बोरीकर यांनाच प्रभारी म्हणून काटोल नगरपरिषदेचा कारभार देण्यात आला परंतु जवळपास एक वर्ष लोटून गेले बोरीकर हे पंधरा पंधरा दिवस पालिकेत उपस्थित राहत नाही. मागील ऐक वर्षात झालेले विकास कामाचे प्रस्ताव तयार करण्यात अनेक महत्त्वपुर्ण निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. नगरसेवकांना आपल्या प्रभागील कामाची चर्चा करण्याकरिता मुख्याधिकारी उपलब्ध होत नाही नागरिकांना आपले प्रश्न मांडण्याकरिता मुख्याधिकारी उपलब्ध होत नाही. विभागात विभागातील कामावर चर्चा करण्याकरिता मुख्याधिकारी उपलब्ध होत नाही. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे दोन दोन महिने नकाशे मंजूर होत नाही त्यांना वेळेवर अनुदान मिळत नाही. एकंदरीत नागरिकांचा रोष वाढत चालला आहे नगरसेवकांचे प्रभागात काम होत नाही, त्यामुळे त्यांच्याबाबतीही लोकांमध्ये नाराजी निर्माण होत आहे. एकंदरीत बोरीकर यांचे काम समाधानकारक नसल्यामुळे नगरसेवकात व शहरातील नागरिकांमध्ये नाराजी बाबतीत नाराजी निर्माण होत आहे. तेव्हा नगर परिषदेत कायमस्वरुपी मुख्याधिकारी द्यावा यामागणीकरिता नगर परिषदेचे उपाध्यक्ष संदीप वंजारी यांच्या नेतृत्वात नगरसेवकांनी विभागीय आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले. प्रशासनाची येत्या पंधरा दिवसांत जर का कायमस्वरुपी मुख्याधिकारी दिला नाही तर काटोल येथे बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा नगरसेवकांनी निवेदनाच्या माफर्त सरकारला दिला आहे. निवेदन देतेवेळी उपाध्यक्ष संदीप वंजारी, बांधकाम सभापती गणेश चन्ने, आरोग्य सभापती डॉ. लतेश जोगेकर, माजी सभापती तथा बहुजन वंचित बहुजन सेनेचे जिल्हा अध्यक्ष दिगांबर डोंगरे, नगरसेवक महेंद्र गायकवाड, अमित काकडे, सुरेन्द्र लोही, राजु अडागडे, अरुण मानकर, नगरसेविका प्रज्ञा डोंगरे, हर्षा खते, जयश्री सावरकर, अभिश्री जोगेकर, ज्योती चरडे यांचेसह गणेश सावरकर, मिलिंद जोगेकर, लिलाधर चराडे, रवी खते उपस्थित होते.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत आष्टा शाळेचे यश



दै. सिंहवाणी वृत्त, हिंगणघाट

जे. डी. चौधरी ज्युनिअर कॉलेज, वासी येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत उच्च प्राथमिक शाळा आष्टा या शाळेच्या प्रतिकृतीला द्वितीय क्रमांक मिळाला. कु. वैभवी गणेश बावणे व कु. स्वरा उमेश शेगोकर या विध्यार्थ्यानी " स्मार्ट ग्रीन एनर्जी हब" ही प्रतिकृती तयार करून परीक्षकांचे लक्ष वेधले. या करिता कु. दीपा राजुरे, विलास पुनवटकर, मुख्यध्यापक सतीश सुरकार यांनी मार्गदर्शन केले. शाळेला मिळालेल्या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी ललितकुमार बारसागडे, विस्तार अधिकारी विनोद पालवे, केंद्रप्रमुख तथा गटसमन्वयक संजय ढोक, विशेष शिक्षक गजानन वैदय,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अतुल तळवेकर उपाध्यक्ष रविना तांदुळकर तसेच सर्व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांनी कौतुक केले.

लावण्या मिसाळ विजयी ठरली



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

जिल्हा परिषद नागपूर द्वारा आयोजित माझा आवाज या जिल्हास्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत नगरपरिषद अध्यंकर प्राथमिक शाळा सावनेरची विद्यार्थिनी हिने ३ ते ५ गटात दुसरा क्रमांक घेऊन अध्यंकर प्राथमिक शाळेचे तसेच सर्व शिक्षकांचे गौरव वाढविले आहे. तिने मी शिवाजी महाराजांकडून काय शिकले या विषयावर आत्मविश्वासाने तेजस्वी व स्पष्ट आवाजात विषयांची मांडणी केली. आणि द्वितीय क्रमांक पटकाविला. तिच्या या यशामुळे शालेय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे .तिचे पालक व वर्गशिक्षिका शिल्पा रंगारी यांचे खूप मोठे योगदान तिच्या यशासाठी लाभलेले आहेत. या यशासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक शिक्षिका व इतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले. भविष्यात होणाऱ्या अशाच विविध स्पर्धेत तिने यश प्राप्त करावे यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेत वक्तृत्व स्पर्धा कला खेळ व्यक्तिमत्व विकास करणारे विविध उपक्रम घेतले जातात.

विदर्भ साहित्य संघाच्या एकांकिका स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी सहा एकांकिकांचे सादरीकरण

सामाजिक प्रश्न, मानवी संवेदना आणि विनोदाची रंगतदार मेजवानी



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूरच्या वतीने आयोजित नाट्यपस्पर्धा राम जाधव स्मृती करंडक विदर्भस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी सहा एकांकिकांचे सादरीकरण करण्यात आले. हिंसा, अंधश्रद्धा, देशाची सुरक्षा, मानवी नातेसंबंध आणि मैत्री अशा विविध विषयांवरील एकांकिकांनी प्रेक्षकांना विचार करायला लावतानाच मनोरंजनाची मेजवानी दिली.

'१९४७ ते ए. के. ४७'मधून हिंसेविरुद्ध मानवी करुणेचा संदेश

कलाभिनय नागपूर प्रस्तुत संजय पवार लिखित व निखिल टोंगळे दिग्दर्शित या एकांकिकेत जातीय दंगलींच्या पार्श्वभूमीवर हिंसा, राजकीय स्वार्थ आणि मानवी संवेदनांचा वेध घेण्यात आला. गांधीवादी सामाजिक कार्यकर्त्या निर्मला भावे आणि हिंसक विचारांनी भरकटलेला तरुण विनायक पटवर्धन यांच्यातील वैचारिक संघर्षातून संवाद, संयम आणि करुणेची ताकद अधोरेखित करण्यात आली.

'ती' ही भूमिका निखील टोंगळे, तर निर्मला भावे यांची भूमिका मयुरी टोंगळे यांनी साकारली.

साक्षी गव्हाणे, ओंकार काळे, शैल चौधरी आणि विक्रम गुरुपंच यांनी कार्यकर्ते व सामान्य नागरिकांच्या भूमिका साकारल्या. रंगभूषा व वेशभूषा श्वेता पतकी, नेपथ्य तन्मय साकोरे, संगीत आभास पेंढारी आणि प्रकाशयोजना अजय करंडे यांनी सांभाळली.

'खानदानी लग्नाचा लोचा'मधून अंधश्रद्धेवर विनोदी प्रहार

गणपती मंदिर देवस्थान, शास्त्री नगर सोसायटी, यवतमाळ प्रस्तुत या एकांकिकेचे लेखन, दिग्दर्शन आणि संगीत दिग्दर्शन डॉ. अशोक चौधरी यांनी केले. दोन खानदानांतील वैर, तरुणाईचे प्रेम आणि भोंदू देवीच्या ढोंगातून निर्माण होणारा गोंधळ विनोदी पद्धतीने सादर करण्यात आला. अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि परंपरागत वैरावर भाष्य करणाऱ्या या एकांकिकेने प्रेक्षकांना हसवतानाच विचार करायला प्रवृत्त केले. नाटकात दिनेश गंधे, आरती गंधे, योगेंद्र भुसे, डॉ. विद्या चौधरी, जय तिजारे, कल्याणी तिजारे, मनीष कासलीकर, डॉ. पूजा राखुंडे, डॉ. चेतन राठोड, डॉ. पूनम राठोड, संजय जीरापुरे, नंदा जीरापुरे आणि सचिन जिरापुरे सहभागी आहेत. संगीत सहाय्य संदीप देशपांडे, प्रकाशयोजना अशोक कालेकर, नृत्यदिग्दर्शन दिनेश स्थूल आणि तांत्रिक सहाय्य मोईन स्टुडिओज यांनी केले.

'रिसर्च अँड अनालिसिस विंग'मधून देशाच्या सुरक्षेचा थरारक वेध

वत्सल क्रिएशन सांस्कृतिक मंडळ, नागपूर प्रस्तुत या एकांकिकेचे लेखन व दिग्दर्शन श्याम आस्करकर यांनी केले. देशात जातीय दंगली घडवून सामाजिक शांतता भंग करण्याचा कटाचा शोध घेणाऱ्या गुप्तहेराची रहस्यमय कहाणी यात मांडण्यात आली. संशय, विश्वासघात आणि अनपेक्षित खुलाशांनी भरलेल्या कथानकाने प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले. अभिनय आकाश दुधनकर, श्रद्धा गुंडे आणि श्याम आस्करकर यांनी साकारला. प्रकाशयोजना अनिल भालेराव, संगीत अमित कुबडे, नेपथ्य दीपक कट्यारामल, रंगभूषा अनन्या बनसोड, वेशभूषा वैभव शिपोरकर आणि रंगमंच व्यवस्था राजू पुसदेकर यांनी सांभाळली. अविनाश तेलंग, नमिता देशपांडे, श्वेता अनासाणे, स्मिता मोहरील, आकाश घरडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

'सुसाईड पॉईंट'मधून जगण्याचा नवा दृष्टिकोन

हरेष मयेकर लिखित आणि मनीष चौधरी दिग्दर्शित या एकांकिकेत आत्महत्येचा विचार करणाऱ्या दोन अनोळखी व्यक्तींची भावस्पर्शी कथा मांडण्यात आली. गंभीर विषयाला विनोदाची खुमासदार फोडणी देत संकटांवर मात करून जगण्याची नवी उमेद मिळविण्याचा आशावादी संदेश देण्यात आला. या एकांकिकेत मनीष चौधरी, रोशनी सेलोकर, रोहित घांगरेकर, साक्षी गुमगावकर आणि रुद्र भद्रे यांनी भूमिका साकारल्या. प्रकाशयोजना हर्ष नागभिडे, नेपथ्य पुण्वशील लांबट व योगेश मेहर आणि संगीत हितेश चोपडा यांनी सांभाळले.

'शेरलॉक होम्स'मधून लेखकाच्या अस्तित्वाचा संघर्ष

देवरंजन बहुउद्देशीय संस्था, नागपूर प्रस्तुत या एकांकिकेचे लेखन देवेंद्र दोडके, दिग्दर्शन प्रवीण देशकर आणि निर्मिती समापती देशकर यांची आहे. स्कॉटिश लेखक सर आर्थर कॉनन डॉयल यांच्या आयुष्यावर आधारित या एकांकिकेत शेरलॉक होम्स या काल्पनिक पात्रामुळे मिळालेली प्रसिद्धी आणि स्वतःची ओळख हरवण्याची भीती यांतील संघर्ष मांडण्यात आला. मयुरेश जोशी आणि चिन्मय देशकर यांनी प्रमुख भूमिका साकारल्या. प्रकाशयोजना ऋषभ दापोडकर आणि पार्श्वसंगीत अनिल इंदाणे यांनी सांभाळले.

'ऑल इज वेल'मधून मैत्रीच्या हक्काच्या विसाव्याचा भावस्पर्शी अनुभव

श्री अनिल जोशी निर्मित, अनिता जोशी लिखित व दिग्दर्शित या एकांकिकेत संघर्षमय आयुष्यात मैत्रिणीच्या सहवासातून मिळणाऱ्या आनंदाचे चित्रण करण्यात आले. जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली वावरणाऱ्या मनाला मैत्रीच्या प्रेमातून मिळणारा हक्काचा विसावा आणि भावनिक आधार या एकांकिकेतून प्रभावीपणे मांडण्यात आला. अर्पणा तायडे, स्मृती गंधे-मुलमुले आणि अनिता जोशी यांनी भूमिका साकारल्या. नेपथ्य संदीप हिवरखेडकर, संगीत अनिल इंदाणे, प्रकाशयोजना ऋषभ धापोडकर यांनी सांभाळली.

अतिधोकादायक इमारतीवर नागपूर महानगरपालिकेची कारवाई, गांधीबाग झोनमार्फत घर पाडले

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : नागपूर शहरातील मोमिनपुरा येथील बडी मज्जित (जामा मज्जित) यांच्या नावावर असलेले सुमारे ८० वर्षे जुने लोड बेअरिंग पद्धतीचे घर अत्यंत जीर्ण व शिखस्त अवस्थेत होते. सदर घराची स्थिती अत्यंत धोकादायक झाल्यामुळे पावसामुळे अथवा अतिवृष्टीमुळे घर कोसळण्याची शक्यता निर्माण झाली होती. तसेच भविष्यात कोणत्याही प्रकारची जीवितहानी अथवा वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. सदर परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत नागपूर महानगरपालिकेच्या गांधीबाग झोनमार्फत दिनांक २९-६-२०२६ रोजी संबंधित घरमालकास सावधानतेचा इशारा देण्यात आला होता. त्यानंतरही घरमालकाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे दिनांक १०-८-२६ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, २०१२ चे कलम २६४ अंतर्गत नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, संबंधित घरमालकाकडून सदर अतिधोकादायक घराबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच संभाव्य जीवितहानी व वित्तहानी टाळण्यासाठी नागपूर महानगरपालिका गांधीबाग झोनमार्फत दिनांक ३-११-२६ रोजी सदर शिखस्त व अतिधोकादायक घर पाडण्यात आले.

तथवडे शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले आनंदाचे हास्य, गॅरेटतर्फे शालेय साहित्य वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, पुणे

उपक्रमशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तथवडे येथे गॅरेट मोशन टेक्नॉलॉजीस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड तर्फे विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय बॅग बरोबर वह्या, कंपास, ड्रॉइंग बुक्स, कलर्स अशाप्रकारे वेगवेगळे साहित्य देण्यात आले. कार्यक्रमाला सी एस आर लीडर कल्पना सदाफुले, सुजाता अलबाल, मोनिका भिलारे, शालिनी मनराल, अभिषेक सुतार, सौरभ जोशी आणि गोपीनाथ चंद्रशेखर आदी मान्यवर उपस्थित होते.

तथवडे येथे गॅरेट मोशन टेक्नॉलॉजीस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड तर्फे विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. मुख्याध्यापक संगीता सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. गुलाब पुष्प व पुस्तक भेट देऊन सर्वांचे स्वागत करण्यात आले. गीतमंचच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत म्हटले. दीपी पारडे हिने व्यासपीठावर आपले मनोगत सादर केले. सी एस आर लीडर कल्पना सदाफुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रत्येक विद्यार्थ्याला शालेय किटचे वाटप केले.

यावेळी मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी, कविता मोहिते, भारती जाधव, जयश्री दांगडे, सारिका भालेकर, शिवप्रसाद गुट्टे, प्रिती चव्हाण, प्रियांका झनकर आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते. मारुंजी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश साबळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. गटशिक्षणाधिकारी संग्राम पाटील आणि गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी शिक्षकांचे अभिनंदन करत शाळेला शुभेच्छा दिल्या आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी केले. तर मुख्याध्यापक संगिता सूर्यवंशी यांनी आभार मानले.

एनपीएस विरोधात जुनी पेन्शन संघटनेचा एल्गार!

काळ्या फिती लावून कर्मचाऱ्यांचा तीव्र निषेध, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर, जुनी पेन्शन योजना लागू करण्याची जोरदार मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

आयुष्यभर शासनाची सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेने आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. ३१ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून शासनाच्या पेन्शन धोरणाचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी, गोंदिया यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



'NPS GO BACK, जुनी पेन्शन लागू करा!'चा बुलंद नारा

शासनाच्या एनपीएस धोरणामुळे कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या भविष्याबाबत असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले. काळ्या फिती लावून कर्मचाऱ्यांनी शासनाच्या धोरणाविरोधात आपला रोष व्यक्त केला. तसेच जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी आक्रमकपणे मांडत कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी संघर्ष सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

'पेन्शन हा हक्क, उपकार नव्हे!'

आयुष्यभर शासनाची सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वृद्धापकाळात सन्मानाने आणि आर्थिक स्थैर्याने जगता यावे, यासाठी जुनी पेन्शन योजना अत्यंत महत्त्वाची आहे. पेन्शन हा कर्मचाऱ्यांवर केलेला उपकार नसून, त्यांच्या प्रदीर्घ सेवेनंतर मिळणारा न्याय्य हक्क आहे. त्यामुळे शासनाने कर्मचाऱ्यांच्या भावनांचा विचार करून जुनी पेन्शन योजना तातडीने लागू करावी, अशी ठाम भूमिका संघटनेच्या वतीने मांडण्यात आली.

यावेळी शिष्टमंडळात महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष तथा अध्यक्ष राज कडव , जिल्हा सचिव जयेश लिल्हारे, गोरेगाव तालुका सचिव कटरे , सुरेश ठकरेले, विश्वनाथ कापगते, के. के. बसोने यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. जुनी पेन्शन योजना लागू होईपर्यंत हा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

मुंबईत अभिजीत राणे यांच्या शुभहस्ते 'वर्तुळ' दिवाळी अंकाचे दिमाखदार

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

साहित्य, संस्कृती आणि सामाजिक जाणीवांचा सुंदर संगम असलेल्या 'वर्तुळ दिवाळी अंक २०२६'चे प्रकाशन रविवार, दिनांक १ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबईतील गोरेगाव येथे मुंबई मित्र या वर्तमानपत्राच्या कार्यालयात मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाले. या प्रकाशन सोहळ्याला साहित्यप्रेमी आणि शब्द शंकरपाळी साहित्य समूहाचे सदस्यांची विशेष उपस्थिती लाभली.

या दिवाळी अंकाचे प्रकाशन प्रमुख अतिथी, धडक कामगार युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मुंबई मित्र वर्तमानपत्र समूहाचे संपादक आणि सर्वांचे लाडके लोकनेते अभिजीत राणे साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी शब्द शंकरपाळी साहित्य समूहातर्फे अभिजीत राणे यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या हस्ते दिवाळी अंकाचे प्रकाशन होणे ही संपूर्ण समूहासाठी अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब ठरली.



या सोहळ्याला शब्द शंकरपाळी साहित्य समूहाचे संस्थापक आणि वर्तुळ दिवाळी अंकाचे संपादक भूषण सहदेव तांबे यांच्यासह सहसंपादिका शलाका कोठावदे, तसेच समूहाचे सदस्य सारंग सबनीस, कु. अंकिता चव्हाण, मृगनयना भजगवरे, कु. सृष्टी कोठावदे, रीना आदी मान्यवर आवर्जून उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. वर्तुळ दिवाळी अंक २०२६ हा केवळ एक दिवाळी अंक नसून विविध साहित्यिकांच्या लेखणीला व्यासपीठ उपलब्ध करून देणारा एक साहित्यिक उपक्रम आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतील तसेच देशाबाहेरील साहित्यिकांनीही या अंकात आपला सहभाग नोंदविला आहे. कविता, कथा, लेख आणि विविध साहित्यप्रकारांच्या माध्यमातून साहित्यविश्वातील वैविध्यपूर्ण विचारांना या अंकात स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे या अंकाच्या प्रकाशनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात माननीय अभिजीत राणे साहेब यांनी उपस्थित सदस्यांशी आणि संपादकांशी साहित्य क्षेत्रासंदर्भात मनमोकळी चर्चा केली. साहित्यनिर्मिती, साहित्यिकांचे योगदान आणि नवोदित लेखकांना मिळणारी संधी अशा विविध विषयांवर त्यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी संपादक भूषण सहदेव तांबे यांनी वर्तुळ दिवाळी अंकाची संकल्पना, त्यामागील भूमिका, अंकाची वैशिष्ट्ये तसेच शब्द शंकरपाळी साहित्य समूहाचा आजपर्यंतचा साहित्यिक प्रवास थोडक्यात मांडला. या उपक्रमाला दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल त्यांनी अभिजीत राणे यांचे मनःपूर्वक आभार मानले.

समारोपप्रसंगी अभिजीत राणे यांनी संपूर्ण शब्द शंकरपाळी साहित्य समूहाला आणि वर्तुळ दिवाळी अंकाच्या संपूर्ण टीमला दीपावली व नूतन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. एकंदरीत, मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेला हा प्रकाशन सोहळा आनंद, उत्साह आणि साहित्यिक जिव्हाळ्याने भारलेला होता. अभिजीत राणे यांच्या शुभहस्ते झालेला वर्तुळ दिवाळी अंकाचा हा प्रकाशन सोहळा शब्द शंकरपाळी साहित्य समूहाच्या साहित्यिक वाटचालीतील एक अविस्मरणीय आणि ऐतिहासिक क्षण ठरला.

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : बुधवार, ४ नोव्हेंबर २०२६

जिल्ह्यात बोअरवेल खोदकामांवर बंदी, घरगुती वापरासाठी अपवाद

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा सुधारित आदेश, शासकीय पाणीटंचाई निवारण कामांना सूट, उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अपुरे पर्जन्यमान आणि जलाशयातील कमी साठ्यामुळे उद्भवू शकणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नवीन बोअरवेल खोदकामे तसेच विद्यमान बोअरवेल अधिक खोल करण्याच्या कामांवर पुढील आदेशापर्यंत बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी यासंदर्भात सुधारित आदेश जारी केला आहे. ही बंदी जिल्ह्यातील संपूर्ण शहरी व ग्रामीण क्षेत्रासाठी लागू राहणार आहे.

मदत व पुनर्वसन विभागाच्या दुष्काळ मूल्यांकन प्रक्रियेअंतर्गत ट्रिगर-१ लागू करण्यात आलेल्या राज्यातील तालुक्यांमध्ये जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे भूजल स्रोतांचे संरक्षण करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवरील अतिरिक्त ताण कमी करणे आणि आगामी काळातील पाणीटंचाईची तीव्रता रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

घरगुती वापरासाठी बोअरवेल खोदकामास सूट

या बंदीतून घरगुती पाणी वापरासाठी करण्यात येणारी बोअरवेल खोदकामे, जुन्या बोअरवेलचे फ्लशिंग करण्याची कामे, त्याचप्रमाणे पिण्याचे पाणी, पाणीटंचाई निवारणासाठी करण्यात येणाऱ्या बोअरवेल खोदकामांनाही सूट देण्यात आली आहे. शासकीय यंत्रणेच्या अधिकृत कार्यादेशानुसार कंत्राटदारांमार्फत करण्यात येणाऱ्या अशा कामांनाही हा अपवाद लागू असेल.

सुरू असलेली प्रतिबंधित कामे थांबविण्याचे निर्देश

अपवाद वगळता सुरू असलेली अन्य सर्व बोअरवेल खोदकामे, विद्यमान बोअरवेल अधिक खोल करण्याची कामे तात्काळ बंद करण्याचे निर्देश आहेत.

खोदकाम बंद केल्यानंतर कोणतीही बोअरवेल उघडी किंवा असुरक्षित स्थितीत ठेवू नये. बोअरवेल कंत्राटदार, रिगमालक आणि यंत्रचालकांनी बंदीच्या कालावधीत प्रतिबंधित खोदकामे स्वीकारू नयेत किंवा सुरू करू नयेत. शासकीय पाणीटंचाई निवारणाचे काम करताना संबंधित कायदेशीर प्रत कामाच्या ठिकाणी उपलब्ध ठेवावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

अवैध खोदकामाची क्षेत्रीय तपासणी

तहसीलदारांनी पोलिस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या समन्वयाने प्रतिबंधित खोदकामांची क्षेत्रीय तपासणी करावी. महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती, पंचायत समिती अधिकाऱ्यांनी संबंधित प्रभाग, ग्रामपंचायती व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना आदेशाची माहिती देऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी. तलाठी आणि ग्रामसेवकांनी प्रतिबंधित खोदकाम आढळल्यास तत्काळ संबंधित तहसीलदारांना माहिती द्यावी.

उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई

बंदीचे उल्लंघन करून बोअरवेल खोदकाम सुरू असल्याचे आढळल्यास सक्षम अधिकाऱ्यांनी ते काम तात्काळ थांबवावे. संबंधित ठिकाणचा स्थळपंचनामा करून छायाचित्रे आणि मालक, कंत्राटदार व यंत्रचालकांचा तपशील नोंदविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या किंवा अंमलबजावणीत अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ तसेच इतर लागू कायदेशीर तरतुदींनुसार विहित प्रक्रिया पाळून कारवाई करण्यात येणार आहे, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

साई नर्सिंग संस्थेच्या कारभाराची सखोल चौकशी करा, डॉ. अमित साळवे यांना निलंबित करण्याची मागणी

शासनाची दिशाभूल करून नियमबाह्य पद्धतीने संस्था चालविल्याचा आरोप, अमिता मडावी यांची पत्रकार परिषदेत मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली : साई इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग अँड मेडिकल सायन्स, वाकडी येथील कारभाराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, संस्थेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी माजी पंचायत समिती सदस्य अमिता शामकांत मडावी यांनी पत्रकार परिषदेत केली. जिल्हा परिषद आरोग्य विभागातील सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमित सुधाकर साळवे यांनी शासकीय पदाचा गैरवापर करून खासगी नर्सिंग संस्था स्थापन केल्याचा तसेच आवश्यक सुविधा नसताना १०० खाटांच्या रुग्णालयाचे नोंदणी प्रमाणपत्र मिळविल्याचा आरोप मडावी यांनी केला. प्रत्यक्षात संस्थेकडे आवश्यक रुग्णालयीन सुविधा, बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभाग तसेच आवश्यक वैद्यकीय यंत्रणा उपलब्ध नसल्याचा त्यांचा दावा आहे. नर्सिंग विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी आवश्यक परवानग्या आणि मान्यतांबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. या प्रकरणात यापूर्वी शासनाकडे तक्रारी करण्यात आल्या असून, आरोग्य सेवा संचालनालयाने ३१ जुलै २०२६ रोजी डॉ. साळवे यांच्याविरुद्ध सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, चौकशी प्रक्रियेवर संबंधित अधिकाऱ्यांचा प्रभाव पडू नये आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, यासाठी डॉ. अमित साळवे यांना तात्काळ निलंबित करून त्यांचे मुख्यालय गडचिरोली जिल्ह्याबाहेर ठेवावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच संबंधित नर्सिंग संस्थेच्या मान्यतेची आणि रुग्णालय नोंदणीची तपासणी करून दोषींवर फौजदारी व विभागीय कारवाई करावी, अशीही मागणी केली.



सावनेर-रामटेक महामार्गावरील बंद पथदिवे सुरु करा!

मुख्यमंत्री, परिवहन मंत्री,खासदार तसेच जिल्हाधिकारी यांना निवेदन

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

शहरातील युवा चिराग संजय मानकर यांने सावनेर रामटेक महामार्गावरील बंद असलेल्या पथदिव्यां सुरु करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परिवहनमंत्री, रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार तसेच जिल्हाधिकारी नागपुर यांना मेल द्वारे निवेदन करुण सदर मार्गावरील बंद असलेल्या पथदिव्यापासुन होणाऱ्या त्रासाबद्दल माहीती देत ते सुरु करण्याची मागणी केली आहे चिराढ मानकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सेनेत्रा पवार, केन्द्रीय मंत्री नितीन गडकरी,रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदर तसेच जिल्हाधिकारी यांना २३ जुलै २०२६ ला मेल करुण नागपुर जिल्ह्यातील सावनेर ते रामटेक हा मार्ग अनेक वर्षा पासुन सिमेंट रोड झाला पण या रोड वर अजुन स्ट्रीट लाइट्स बसवण्यात आले नाही दिवसांनी प्रवास करताना काही वाटत नाही. पण रात्रिच्यावेळी स्ट्रीट लाइट्स नसल्यामुळे फार अडचणी निर्माण होते.



या रोडवर रात्रीच्या वेळी याच कारणामुळे अपघात झाले आहे. चोर चोरी करत आंधारचा फायदा उचलत हायवे नी पळत आणि शेतात जाऊन लपत दर वर्षी वाघ, बिबट सारखे वन्य प्राणी काही न काही लोकांन च नुकसान करून जाते आधाराचा फायदा घेऊन सावनेर च्या जाँन शाळा पासून या रोड ची सुरुवात होते. खापा गावं पर्यंत पथदिवे नाही. त्यानंतर खापा कन्हानदी पूल नंतर, दहेगाव (जोशी) ते पारशिवणी नंतर (पारशिवणी ते नायकुंड फाटा उड्डाणपूल खालचा रोड अमाडी गाव जवळ) स्ट्रीट लाइट्स नाही. जे लोक रोज सावनेर ते रामटेक किंवा सावनेर ते पारशिवनी च्या रेस्टॉरंट किंवा ढाबा मध्ये किंवा कोणते पण काम करत असलेल लोक मध्यम वर्गीय लोक आहे त्यांना या अंधार वाटे चा त्रास आहे. रात्री च्या वेळी कोण हल्ला करेल चोर असो किंवा जंगली जनावर काही सांगता येत नाही. कृपया लवकरात लवकर या मुद्या वर सर्वांनी लक्ष द्यावे स्ट्रीट लाइट्स देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.

त्या अनुशंगाने जिल्हा सह आयुक्त नगर प्रशासन शाखा नागपुर जिल्हाधिकारी कार्यालय यांनी सावनेर नगर पालीकेच्या मुख्याधिकारी सह संबंधित नगरपालिकांना पत्र देऊन त्यांचे अधिकार क्षेत्रात उपाययोजना करण्याचे पत्र प्रेषीत केले असुन सदर कार्य पुर्ण झाल्याच्या सुचना जिल्हाधिकारी कार्यालय व तक्रारकर्ते यांना देण्यात यावे असे पत्र पाठण्यात आले असल्याने सदर मार्गावरील आंधार उजेळात बदलण्याचा विश्वास चिराग मानकर यांनी व्यक्त केला आहे.

'ग्लोबल वन चॅम्पियनशिप'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

७५ शाळांमधील १,३०० हून अधिक युवा खेळाडूंचा राहिला सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस), लावा, नागपूर येथे ३१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ दरम्यान ग्लोबल वन चॅम्पियनशिप (जी१सी)चे भव्य प्रमाणात आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत शहरातील ७५ शाळा आणि कॅम्पसमधील सुमारे १,३०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बास्केटबॉल, बुद्धिबळ, फुटबॉल, कराटे आणि टेबल टेनिस या सात क्रीडा प्रकारांचा समावेश होता. १० वर्षाखालील (यू-१०), १२ वर्षाखालील (यू-१२), १४ वर्षाखालील (यू-१४) आणि १७ वर्षाखालील (यू-१७) अशा चार वयोगटांत मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात आल्या. जिल्हा क्रीडा संघटनेच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.



जीआयआयएस लावा नागपूर, सेंट क्लेरेट स्कूल, बुटीबोरी आणि संजुबा हायस्कूल या शाळांमधील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. विविध क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंना हैदराबाद येथे होणाऱ्या आगामी ग्रँड फायनलसाठी थेट पात्रता मिळाली आहे. वावेळी यू-१०, यू-१२, यू-१४ आणि यू-१७ या मुला-मुलींच्या गटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना मोस्ट व्हॅल्युएबल प्लेअर (एमव्हीपी) पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी जीआयआयएस नागपूरच्या विद्यार्थ्यांनी विशेष सांस्कृतिक सादरीकरण केले.

जीआयआयएस नागपूरच्या प्राचार्या श्रीमती निधी गुप्ता यांनी हैदराबाद येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या सर्व सहभागी खेळाडूंना दिल्या.

संजय गांधी निराधार व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

आशिष जयस्वाल राज्यमंत्री यांच्या सहमतीने नियुक्त झालेले संजय गांधी श्रावण बाळ समितीनी आज पारशिवनी तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार विभागामध्ये संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेची मासिक समिती बैठक संपन्न झाली. या बैठकीस संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष राजू के. भोस्कर, समिती सदस्य प्रेमजी भांडेकर, मनोहरजी पाठक, माधुरीजी बावनकुळे, रोशनजी पिंपरूळे, आशिषजी ढोटे, अनिल वांढे गजानन गजानन गोहरले तसेच नायब तहसीलदार कुभरे साहेब आणि संजय गांधी निराधार विभागीय अधिकारी प्रितमजी शेंडे उपस्थित होते. बैठकीमध्ये संजय गांधी निराधार योजना चे ६६ व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजने अंतर्गत प्राप्त ७३ अर्जाची छाननी करून पात्र लाभार्थ्यांच्या अर्जांना नियमानुसार मंजुरी प्रदान करण्यात आली. संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी शासकीय अनुदानाची रक्कम डीबीटी द्वारे आपल्या बँक खात्यात जमा होण्यासाठी पारशिवनी तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार विभागाशी लवकरात लवकर संपर्क साधावा. डीबीटी प्रक्रियेसाठी आधार कार्ड, बँक पासबुक व आवश्यक कागदपत्रे सोबत घेऊन तहसील कार्यालयात भेट द्यावी आणि शासनाच्या अनुदानाचा लाभ मिळवून घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



'गूँज ऑफ सीताराम' नागपुरातील सर्वात मोठी भजन बैठक ७ नोव्हेंबरला

'हनुमान अंश'च्या टीमसोबत भक्तिसंगीताचा अनुभव घेण्याची संधी, झिरो माईल यूथ फाउंडेशनतर्फे मानकापूर इनडोअर स्टेडियम येथे भव्य आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भक्तिसंगीत, रामभक्ती आणि सामूहिक गायनाचा अनोखा संगम असलेली गूँज ऑफ सीताराम ही नागपुरातील सर्वात मोठी भजन बैठक येत्या शनिवारी, ७ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. झिरो माईल यूथ फाउंडेशनच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात लोकप्रिय चित्रपट हनुमान अंशची टीम आपल्या संगीताची प्रस्तुती करणार आहे. मानकापूर इनडोअर स्टेडियम येथे सायंकाळी ६ वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होईल.



हनुमान अंश हा चित्रपट सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. पाच दशकांपूर्वी देहत्याग केलेल्या नीम करोली बाबा यांच्या जीवनापासून प्रेरणा घेऊन हा चित्रपट तयार करण्यात आला आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक व लेखक विशाल चतुर्वेदी, संगीत दिग्दर्शक शंतनू सुदामे आणि धीरेंद्र मुलकलवार, गायक साधू सुशील तिवारी आणि सुनील लोधी यांच्यासह चित्रपटाची सुमारे २० जणांची टीम या कार्यक्रमात सहभागी होणार आहे.

या चित्रपटातील हे खरारी, पार्वती आणि जय हनुमान यांसारखी भक्तिगीते लोकप्रिय ठरली आहेत. ही गीते या कार्यक्रमात सादर केली जाणार असून, संगीतप्रेमींना चित्रपटाच्या टीमसोबत भक्तिसंगीताचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

'संगीत में भक्ति, भक्ति में सभी का संग' या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमात सामूहिक गायन, भजन, सूफी संगीत, रामभक्ती आणि लाइव्ह जॅमिंगच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण अनुभवता येणार आहे. नागपूरमधील सर्वात मोठी भजन जॅमिंग बैठक म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असला तरी प्रवेशिकाद्वारेच कार्यक्रमस्थळी प्रवेश दिला जाणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश या तत्त्वावर बैठक व्यवस्था राहील. युवक, महिला आणि पुरुषांसह सर्वांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या कार्यक्रमासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेला झिरो माईल यूथ फाउंडेशनचे कल्याण देशपांडे, प्रशांत कुकडे आणि समय बनसोड, जॅमिंग बैठकचे मयूर मोटवानी, नो डिफरन्स फाउंडेशन आणि हाफ टाइमचे हिमांशू अरमारकर, माहौलचे यश तुमाने आणि पारस रोकडे तसेच माधव नेत्रालयाचे सागर गभणे उपस्थित होते.

थोडक्यात

गोव्यात लवकरच 'विदर्भ महोत्सव'चे आयोजन करणार : दिगंबर कामत

राम जाधव स्मृती एकांकिका महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी दिल्या स्पर्धेला शुभेच्छा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने आयोजित राम जाधव स्मृती विदर्भस्तरीय एकांकिका महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी गोव्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान मंत्री दिगंबर कामत विशेषत्वाने उपस्थित होते. त्यांनी महोत्सवाला शुभेच्छा देत गोवा आणि विदर्भातील सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्याची इच्छा व्यक्त केली. वावेळी बोलताना दिगंबर कामत म्हणाले, "गोवा हा कलावंतांची कदर करणारा प्रदेश आहे. त्याचप्रमाणे विदर्भदेखील आपल्या रसिकतेसाठी प्रसिद्ध आहे. विदर्भात गोवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याच धर्तीवर लवकरच गोव्यात विदर्भ महोत्सव आयोजित करण्याचा माझा प्रयत्न असेल."

गोवा आणि विदर्भातील सांस्कृतिक देवाणघेवाण वाढविण्याच्या दृष्टीने हा महोत्सव महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. वावेळी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, उपाध्यक्ष अरुणा सबाने, सरचिटणीस विलास मानेकर, पराग घोंगे, सतीश पावडे, जयश्री कापसे यांच्यासह इतर कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. गिरीश गांधी यांच्या भेटीसाठी आपण विशेषत्वाने नागपुरात आल्याचे कामत यांनी आवर्जून सांगितले. एकांकिका महोत्सवाच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध होत असून, अशा उपक्रमांमुळे रंगभूमीची समृद्ध परंपरा अधिक बळकट होईल, असेही त्यांनी नमूद केले.

रामटेकमध्ये 'सुरक्षित बालपण' व महिला सक्षमीकरणावर कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना कायद्याविषयी मार्गदर्शन



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक येथील स्व. मोहन मंगल सांगोडे नगर परिषद उच्च प्राथमिक शाळेत सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी दिवाणी व फौजदारी न्यायालय, रामटेक यांच्या वतीने सेफ चाइल्डहूड (सुरक्षित बालपण) आणि इंटरनॅशनल वुमेन्स वीकच्या निमित्ताने कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासोबतच बालकांचे हक्क, सुरक्षित बालपण आणि महिला सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाला रामटेक येथील न्यायालयाचे वरीष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश पी. के. मुटकुळे, मयूर गुप्ता, प्रीती महाजन तसेच रामटेक नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी प्रविण सरगर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

वावेळी उपस्थित न्यायाधीश व विधिज्ञांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित बालपणाचे महत्त्व, बालकांचे कायदेशीर हक्क, कायद्याचे पालन, अन्यायाविरुद्ध जागरूकता तसेच महिला सक्षमीकरण या विषयांवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी लहान वयापासूनच कायद्याची मूलभूत माहिती जाणून घेणे आवश्यक असून, स्वतःच्या हक्कांसोबतच इतरांच्या हक्कांचाही आदर करावा, असे आवाहन याप्रसंगी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत हुड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सोनाली भगत यांनी केले.

थोडक्यात

महापौरांच्या हातात बॅट अन् मैदानात झाली दणदणीत फटकेबाजी

महापौर यांच्या हस्ते महापौर चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे थाटात उद्घाटन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महिला खेळाडूंमधील सुप्त क्रीडागुणांना योग्य वाव मिळवून देण्यासह त्यांना उच्च स्तरावर खेळण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वपूर्ण उद्देशाने नागपूर महानगरपालिकेच्या वतीने महापौर चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे अत्यंत दिमाखदार सोहळ्यात आयोजन करण्यात आले आहे. महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या विशेष पुढाकारातून सुरू झालेली ही स्पर्धा शहरातील यशवंत स्टेडियम येथे ८ नोव्हेंबरपर्यंत रंगणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर, क्रीडा विशेष समिती सभापती श्रीमती दर्शनी धवड, नगरसेविका श्रीमती वैशाली उदापूरकर, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विशेष म्हणजे, उद्घाटना प्रसंगी खेळाडूकरिता अत्यंत उत्साहवर्धक आणि लक्षवेधी प्रसंग पाहायला मिळाला. उद्घाटनानंतर महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी केवळ विधिवत पूजा करून औपचारिकता न पाळता, थेट मैदानावर उतरत बॅट हातात घेतली. उपस्थित इतर पदाधिकारी आणि खेळाडूंच्या साक्षीने त्यांनी क्रिकेटच्या खेळपट्टीवर चेंडूवर दणदणीत फटकेबाजी केली. त्यांच्यासह स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर, क्रीडा विशेष समिती सभापती श्रीमती दर्शनी धवड यांनी देखील गोलंदाजी व फलंदाजीचा आनंद घेतला. सत्तापक्ष नेते श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी देखील जोरदार फटकेबाजी केली. महापौर आणि इतर पदाधिकार्यांच्या या उत्साही आणि खेळाडू वृत्तीच्या अंदाजाने संपूर्ण स्टेडियममधील महिला खेळाडू आणि प्रेक्षकांची मने जिंकली, आणि टाळ्यांच्या गजरात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यानंतर महापौर व अन्य पदाधिकाऱ्यांनी काही वेळ क्रिकेटच्या या रोमहर्षक सामन्याचा मनसोक्त आनंद घेतला.

महापौर यांच्या हस्ते सामनावीर आरजू तिम्मा हिला पारितोषिक प्रदान करण्यात आले. या स्पर्धेत शहरातील ८ नामांकित महिला क्रिकेट संघांमधील एकूण १२० खेळाडू सहभागी नोंदविला आहे. सहभागी संघांची अ आणि ब अशा दोन गटांत विभागणी करण्यात आली आहे. विजेता संघास जेतेपदाचा चषक व १ लक्ष रुपयांचे पारितोषिक उपविजेता संघास ५१ हजार रुपयांचे पारितोषिक तसेच या स्पर्धेतील व्यक्तिगत कामगिरीसाठी सामनावीर, मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज आणि उत्कृष्ट गोलंदाज असे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यात सामनावीर खेळाडूस सन्मानचिन्ह व रुपये २१००, मालिकावीर खेळाडूस सन्मानचिन्ह व रुपये २१,००, उत्कृष्ट फलंदाज खेळाडूस सन्मानचिन्ह व रुपये २१,००, उत्कृष्ट गोलंदाज खेळाडूस सन्मानचिन्ह व रुपये २१,०० अशा प्रकारे खेळाडूंना पुरस्कृत करण्यात येणार आहे.

'देशभक्तीच्या सुरांवर थिरकले वीर जवान; महार रेजिमेंटतर्फे कॉस्मिक कल्चरल इव्हेंट्सच्या टीमचा गौरवपूर्ण सन्मान'



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय सैन्याच्या गौरवशाली ३७ व्या बटालियन महार रेजिमेंटचा ८४ वा स्थापना दिन सोहळा छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन, नागलोक, कामठी रोड, नागपूर येथे उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या गौरवशाली प्रसंगी कॉस्मिक कल्चरल इव्हेंट्सच्या आयोजिका सारिका खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात गायिका स्वाती थोरात, रुचिर झाडे, राहुल तुमसरे आणि एडवर्ड अँथनी यांनी एकापेक्षा एक सरस देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. देशभक्तीपर गीतांच्या सुरेल चाली आणि जोशपूर्ण संगीताने उपस्थित वीर जवानांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले. विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे देशभक्तीपर गीतांवर भारतीय सैन्यातील जवानांनी केलेले उत्स्फूर्त आणि जोशपूर्ण नृत्य. जवानांचा उत्साह पाहून उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमातील एक अभिमानास्पद क्षण म्हणजे भारतीय सैन्यातील वीर जवानांच्या हस्ते कॉस्मिक कल्चरल इव्हेंट्सच्या आयोजिका सारिका खडसे आणि त्यांच्या संपूर्ण टीमला सन्मानचिन्ह तसेच भारतीय संविधानाची प्रत भेट देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान संपूर्ण टीमसाठी अभिमानाचा आणि अविस्मरणीय क्षण ठरला. या प्रसंगी माजी सैनिक, वीर जवान तसेच त्यांच्या कुटुंबीयांची उपस्थिती सोहळ्याची शोभा वाढवणारी ठरली. संगीत आणि देशभक्तीचा अनोखा संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. यावेळी आयोजिका सारिका खडसे यांनी भारतीय सैन्यातील सर्व वीर जवान आणि माजी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. त्या म्हणाल्या की, देशभक्तीपर गीते ही केवळ संगीताची अभिव्यक्ती नसून देशाप्रती असलेले प्रेम, समर्पण आणि बलिदानाची भावना व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. कॉस्मिक कल्चरल इव्हेंट्सच्या या संगीतमय सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संगीताच्या माध्यमातून भारतीय सैन्याप्रती आदर, कृतज्ञता आणि राष्ट्रप्रेमाचा सुंदर संदेश या कार्यक्रमाने दिला.

दिल्लीतील ओबीसींच्या आंदोलनासाठी खैरे कुणबी महासंघाचा पुढाकार

१४ व १५ डिसेंबरला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन, राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या आंदोलनाच्या यशस्वितेसाठी ११ जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती, जिल्हानिहाय जनजागृती करण्याचा निर्धार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने येत्या १४ व १५ डिसेंबर २०२६ रोजी दिल्ली येथील रामलीला मैदानावर आयोजित करण्यात येणाऱ्या धरणे आंदोलनात ओबीसी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, या उद्देशाने राष्ट्रीय खैरे कुणबी महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक रविवार, १ नोव्हेंबर रोजी नागपूर येथील हॉटेल अतिथी इन, मानेवाडा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राष्ट्रीय खैरे कुणबी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुभाषभाऊ घाटे, राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सौ. रत्नमालाताई पिसे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सहसचिव शरदराव वानखेडे, ज्येष्ठ सल्लागार तथा विदर्भ अध्यक्ष शकील पटेल, नागपूर शहर जिल्हाध्यक्ष परमेश्वरभाऊ राऊत, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर, राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या डॉक्टर सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विनोद चौधरी, राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी



अधिकारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष श्याम लेडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यशस्वितेसाठी करावयाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय युवाध्यक्ष सुभाषभाऊ घाटे, राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सौ. रत्नमालाताई पिसे, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सहसचिव शरदराव वानखेडे, ज्येष्ठ सल्लागार तथा विदर्भ अध्यक्ष शकील पटेल, नागपूर शहर जिल्हाध्यक्ष परमेश्वरभाऊ राऊत, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर, राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या डॉक्टर सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विनोद चौधरी, राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष श्याम लेडे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. बबनराव तायवाडे यांचे सविस्तर मार्गदर्शन

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. बबनराव तायवाडे यांनी राष्ट्रीय ओबीसी महासंघाची स्थापना, संघटनेची कार्यपद्धती, आजपर्यंत ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी केलेला संघर्ष आणि विविध स्तरांवर राबविण्यात आलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय प्रगतीसाठी संघटित शक्ती निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

ओबीसी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे आणि देशाचे लक्ष वेधण्यासाठी दिल्ली येथील रामलीला मैदानावर १४ व १५ डिसेंबर रोजी धरणे आंदोलन आयोजित करण्यात येत आहे. या आंदोलनात केवळ काही मोजक्या कार्यकर्त्यांनी नव्हे, तर देशभरातील ओबीसी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपली एकजूट दाखवून द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. समाजाच्या हक्कांसाठी संघटितपणे आवाज उठविणे, आपल्या मागण्यांची तीव्रता शासनापर्यंत पोहोचविणे आणि ओबीसी समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करणे यासाठी अशा आंदोलनांचे महत्त्व मोठे आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला तसेच समाजातील विविध घटकांनी आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी सांगितले.

११ ; जिल्हानिहाय जनजागृतीचा निर्धार

सदर बैठक राष्ट्रीय कार्यकारिणीची असल्यामुळे महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांतील राष्ट्रीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत दिल्ली येथील आंदोलनाची माहिती समाजातील तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हानिहाय नियोजन करण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रत्येक जिल्ह्यात बैठका, समाज बांधवांशी संवाद आणि जनजागृतीच्या माध्यमातून आंदोलनाबाबत वातावरणनिर्मिती करावी. तसेच जास्तीत जास्त ओबीसी बांधवांनी दिल्ली येथे पोहोचून आंदोलनात सहभागी व्हावे, यासाठी पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे ठरविण्यात आले.

गुणेश्वर आरीकर यांचे एकजुटीचे आवाहन

बैठकीच्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय खैरे कुणबी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गुनेश्वरराव आरीकर यांनी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या नेतृत्वाखाली होणारे दिल्लीतील आंदोलन यशस्वी करण्यासाठी खैरे कुणबी महासंघ पूर्ण ताकदीने सहकार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला. प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपापल्या जिल्ह्यात आंदोलनाबाबत व्यापक जनजागृती करावी. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आंदोलनाचा उद्देश पोहोचवून जास्तीत जास्त ओबीसी समाज बांधवांना दिल्ली येथील धरणे आंदोलनात सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे. ओबीसी समाजाची ताकद ही त्याच्या एकजुटीत असून, सर्वांनी संघटनात्मक जबाबदारी ओळखून काम केल्यास आंदोलन निश्चितच प्रभावी ठरेल, असे आवाहन त्यांनी केले. या बैठकीच्या माध्यमातून दिल्ली येथील आंदोलनाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय खैरे कुणबी महासंघाने संघटनात्मक पातळीवर पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त केला. ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी सर्व समाजबांधवांनी एकत्र येऊन आपली सामूहिक ताकद दाखविण्याची गरज असल्याचा सूर बैठकीत व्यक्त करण्यात आला.

महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी' अभियानातील विशेष संकलन केंद्राचे उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घरोघरी करण्यात येणाऱ्या स्वच्छतेतून निघणाऱ्या जुन्या, निरुपयोगी व वापरात नसलेल्या वस्तूंची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावून त्यांचा पुनर्वापर व पुनर्चक्रण करण्याच्या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेतर्फे यंदाही 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नागपूर शहरातील दहाही झोनमध्ये एकूण ४७ विशेष संकलन केंद्रे (दिवाळी वेस्ट डोनेशन सेंटर्स) उभारण्यात आले असून, नागरिकांसाठी ही विशेष व्यवस्था ६ नोव्हेंबरपर्यंत उपलब्ध राहणार आहे.

या अभियानाचा शुभारंभ मंगळवारी(ता.०३) महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या हस्ते सिव्हील लाईन्स स्थित महानगरपालिकेच्या



प्रशासकीय इमारतीतील विशेष संकलन केंद्राचे उद्घाटन करून करण्यात आला. यावेळी मनपा आयुक्त डॉ. विपिन, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती श्रीमती मनिषा अतकरे, उपायुक्त श्री. राजेश भगत, श्री. मुख्य स्वच्छता अधिकारी श्री. गजेंद्र महल्ले, यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौरांनी वापरात नसलेल्या वस्तूंना मनपा मुख्यालयातील संकलन केंद्रात जमा करत शहरातील नागरिकांना सुद्धा वस्तू रस्त्यांवर, मोकळ्या जागेत त्यांचे योग्य संकलन व व्यवस्थापन व्हावे, यासाठी संकलन केंद्रांचा वापर करण्याचा कृतीतून संदेश दिला. याशिवय मनपाच्या झोन सभापतींनी झोननिहाय संकलन केंद्रांचे उदघाटन केले.

या विशेष संकलन केंद्रांवर नागरिकांना घरातील वापरात नसलेल्या व टाकाऊ वस्तू जमा करता येणार आहेत. यामध्ये जुने कपडे, पुस्तके, खेळणी, पुनर्वापरयोग्य वस्तू, घरगुती वापरातील निरुपयोगी साहित्य तसेच इतर टाकाऊ वस्तूंचा समावेश असेल. संकलित वस्तूंचे योग्य वर्गीकरण करून पुनर्वापरयोग्य वस्तूंचा पुनर्वापर, पुनर्चक्रणयोग्य साहित्याचे पुनर्चक्रण तसेच उर्वरित कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यावर भर देण्यात येणार आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या या उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून घरातील वापरात नसलेल्या वस्तू रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी न टाकता जवळच्या विशेष संकलन केंद्रावर जमा कराव्यात. वस्तूंचा पुनर्वापर, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाच्या माध्यमातून स्वच्छ व सुंदर नागपूर घडविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

दिवाळी तोंडावर, अग्रिम मदतीचा पत्ताच नाही

वृत्तसंस्था, लातूर

पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने खरीप हंगाम पूर्णतः हातचा गेला असून, निलंगा तालुक्यातील शेतकऱ्यांवर दुष्काळाचे संकट अधिकच गडद झाले आहे. पिके उद्ध्वस्त झाल्याने शेतक-यांचे आर्थिक कंबरडे मोडले असताना शासनाने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची अग्रिम मदतही विविध प्रशासकीय निकषांच्या कचाट्यात अडकली आहे.



आयकरदात्यांना वगळण्यासह विविध अटींमुळे मदतीचा लाभ मिळण्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. दिवाळी तोंडावर आली तरी शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा झालेली नसल्याने शासनाची घोषणा केवळ कागदावरच राहणार का, असा संतप्त सवाल दुष्काळग्रस्त शेतकरी उपस्थित करीत आहेत.

निलंगा तालुक्यात एकूण ८२ हजार ३८५ शेतकरी असून, त्यापैकी ७० हजार १७५ शेतकरी अल्पभूधारक असल्याची माहिती आहे. सुमारे ७० हजार शेतकरी कोरडवाहू शेतीवर अवलंबून आहेत, तर फार्मर आयडी असलेल्या शेतकऱ्यांची संख्या सुमारे ६५ हजार आहे. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे सोयाबीन, उडीद, मूग यांसह खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतात उभे पीक हातचे गेल्याने उत्पन्नाचा स्रोतच बंद झाला असून, कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन खर्च भागविण्याचे आव्हान आहे.

थेंबे थेंबे तळे साचे...?

झाडाझडती

विनोद देशमुख
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

चार राज्यांच्या २८ विधान परिषद जागांमध्ये काँग्रेसला फक्त एकच जागा मिळाली, हा भाजपासाठी समाधानाचा मुद्दा ठरू शकतो का, हा लाख नव्हे, कोटीमोलाचा प्रश्न आहे बघा. फक्त आकड्यांच्या आधारे निष्कर्ष काढून तर्क समाधान मानताही येईल. परंतु, संघ परिवाराचं मुख्यालय आणि जन्मस्थान असलेल्या नागपुरात लागोपाठ दुसऱ्यांदा आम्ही भाजपाचं नाक कापलं, हा काँग्रेससाठी त्यापेक्षाही जास्त समाधानाचा आणि सध्याच्या राजकीय परिस्थितीत महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे, हे कोणत्याही राजकीय अभ्यासकाला अमान्य करता येणार नाही. शताब्दीनिमित्त संघाचा डंका जगभर वाजत असताना, मायभूमीच्या परंपरागत मतदारसंघात, सुविद्य पदवीधर मतदारही अंगठा दाखवत असतील तर नियोजनात काहीतरी गंभीर चूक झाल्याचं मान्य करून भाजपानं आत्मचिंतन आणि उपाय केले पाहिजे, असंच त्यांचे चाहते म्हणतील.

ही अपेक्षा पूर्ण होते की नाही, ते ६ वर्षांनी म्हणजे २०३२ च्या निवडणुकीतच लक्षात येईल. पण तोवर नाग नदीतून बरंच पाणी वाहून गेलेलं राहील!

या निवडणुकीची मतमोजणी ठिकठिकाणी सुरू असताना त्यांचे कल आणि काही निकाल पाहून पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांची प्रतिक्रिया आली की- "ईव्हीएम नव्हे, तर मतपत्रिकेवर झालेल्या या निवडणुकीत काँग्रेस कुठं आहे?" म्हणजे, काँग्रेसचा पूर्ण सफाया होईल, या अंदाजानं पंतप्रधान हे बोलले. (काँग्रेसची सत्ता असलेल्या कर्नाटकात तसं घडलं सुद्धा.) पण नागपूरनं नाट लावून पंतप्रधानांची अपेक्षा फोल ठरवली. उलट, सध्याच्या तप्त वातावरणात काँग्रेसच्या हातात कोलीत देण्याचंच काम केलं, असंही म्हणता येईल. एवढं राष्ट्रीय महत्त्व या पराभवाला आहे. पूर्व विदर्भातील ६ जिल्ह्यांमध्ये दिग्गज केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्र्यांसह मंत्री, खासदार, आमदार असे पन्नासेक लोकनिवाचित बडे नेते महायुतीचे असताना भाजपाचा उमेदवार पडतो, ही साधी गोष्ट नसून त्यांच्यासाठी चिंतेचीच बाब आहे.

नागपूरची लढत "काट्याची टक्कर" होती, हे खरं आहे. काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी गेल्यावेळी ही जागा पहिल्यांदा भाजपाकडून हिसकली होती आणि पुन्हा तेच मैदानात होते. यावेळचा निकालही 'तसाच' विरोधात जाण्याचं कारणही पुन्हा भाजपा स्वतःच असल्याचं मानलं जातं. प्रा. अनिल सोले यांची बंडखोरी आणि नंतर माघार या नाट्याचा काही प्रमाणात नक्कीच परिणाम झाला, हे कोणीही नाकारू शकत नाही. परंतु त्यानंतरही भाजपाचे उमेदवार सुधाकर कोहळे, निसटते का होईना, विजयी होऊ शकले असते, अशी परिस्थिती होती. त्यांच्या नावापुढे २ आकडा लिहिलेल्या चार हजारावर मतपत्रिका बाद ठरल्या. या मतदारांनी १ आकडा लिहिला असता तर कोहळेच जिंकले असते. किंवा, कोहळेंना २ आणि दुसऱ्या कमी महत्त्वाच्या उमेदवाराला १ क्रमांक देऊन या मतपत्रिका वैध ठरवता आल्या असत्या आणि ही दुसऱ्या पसंतीची मतं कोहळेंच्या कामी आली असती. पण ती वाया गेल्यामुळं याच बाद मतांनी कोहळेंचा 'निकाल' लावला, हे अगदी उघड आहे. म्हणजे, दुसऱ्या पसंतीच्या मतांचं नियोजन चुकलं, असं स्पष्ट दिसत आहे.

हे अवैध मतदान चुकून झालं की ठरवून घडलं, हा याप्रकरणातील सर्वाधिक चर्चेचा आणि कसून शोध घेण्यासारखा मुद्दा आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पदवीधर मतदार असा गावंढळपणा चुकीनं करतील, असं वाटत तर नाही. (पण, प्रत्यक्षात तसंच घडलं असेल तर मात्र या लोकांना सुशिक्षित म्हणण्याला काहीच अर्थ उरत नाही !) मग, नाराजी, गटबाजी यातून तर घातपात झाला नाही, असा संशय बळावला आहे. त्याहीदृष्टीनं, नकारात्मक मतदान करणाऱ्यांनी 'लक्ष्य' ठेवून चुकीचं मतदान केलं का, याचा तपास करणं भाजपाला आता भाग आहे. त्याचा निष्कर्ष महत्त्वाचा ठरेल.

नागपूरप्रमाणेच पंतप्रधान, संरक्षणमंत्री, भाजपाध्यक्ष यांच्या मतदारसंघांमधील विधान परिषदेच्या जागाही भाजपानं गमावल्या, हाही पक्षासाठी मोठा धक्का आहे. हे पराभवही "बूंद से गई..." गटात मोडणारेच आहेत.

उत्तर प्रदेशात २०२७ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत समाजवादी पार्टीनं आव्हान कडवं राहणार, हे या निवडणुकीनं दाखवून दिलं आहे. एक कर्नाटक सोडलं तर, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि बिहार या तीनही राज्यांमध्ये स्वतःची सत्ता असताना भाजपाला धक्के बसले. नागपूरचा पराभव तर चाहत्यांच्या वर्मी लागणाराच आहे. या सर्वांची नोंद घेऊन काही कठोर "डॅमेज कंट्रोल" होणार की बूंद म्हणत दुर्लक्ष केलं जाणार, याची चाहत्यांना आता प्रतीक्षा आहे. यावेळी एक नव्हे, अनेक बूंद दिसून आले. त्यांचं तळं व्हायला वेळ लागणार नाही, हाच विधान परिषद निवडणुकीचा इशारा!